बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर
धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १८१ वा । शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### पाणबुडी मोटर व केबलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी धुळाप्पा महादेव रक्षे, वय ५१ वर्षे, रा. घट्टेवाडी काटगाव ता.तुळजापूर जि. धाराशिव यांचे काटगाव शिवारातील शेत गट नं ४४९ मधील विहीरीवरील जी.के. एनर्जी सौर पाणबुडी मोटर, १०० फुट केबल व ७० फुट रस्सी असा एकुण ५०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि.१०.०९.२०२५ रोजी १९.०० ते दि. ११.०९.२०२५ रोजी ०६.०० वा. सु. चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-धुळाप्पा रक्षे यांनी दि.२४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजापूरात सोन्याच्या दागिण्याची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-गुंडम्मा रमेश कल्यापा, वय ४४ वर्षे,रा. मदगाव ता. हुमनाबाद जि. बिदरराज्य कर्नाटक या दि.२४.०९.२०२५ रोजी ०५.०० वा. सु. तुळजापूर येथे देवदर्शनासाठी आल्या असता श्री तुळजाभवानी मंदीराचे समोरील महाद्वारचे उजव्या बाजूचे दुकानात साहित्या खरेदी करत असताना प्रिती रा. अकोला यांनी गुंडम्मा कल्यापा यांचे गळ्यातील १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण ६०,००० किंमतीचे कट करुन चोरुन नेले.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गुंडम्मा कल्यापा यांनी दि.२४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव रुग्णालय येथून पर्स व रकमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी -रोहीणी जनार्धन कोकीळ, वय ४५ वर्षे, रा. रामनगर जिजामाता उद्यान जवळ धाराशिव ता. जि. धाराशिव यांची पर्स व रोख रक्कम १८,००० हे दि. २४.०९.२०२५ रोजी शासकीय रुग्णालय धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रोहीणी कोकीळ यांनी दि.२४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रितम प्रभाकर गायकवाड, येवती ता. तुळजापूर यांची मोटरसायकल ही दि. २३.०९.२०२५ रोजी प्रितम गायकवाड यांचे राहते घराचे समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## साडेसांगवी पुरग्रस्त शेतकऱ्यांनी मांडल्या व्यथा : उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी तातडीने दिले मदतीचे आदेश



धाराशिव (जिमाका) सगळं काही वाहून गेलं आहे,फक्त आत्महत्या करणं बाकी राहिलंय अशा शब्दांत साडेसांगवी (ता.भूम) येथील पुरग्रस्त शेतकरी ज्ञानेश्वर डोंबाळे यांनी आपली व्यथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी आज साडेसांगवी गावाला भेट देऊन अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीची पाहणी केली.यावेळी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने मदत सुरू करा अशा स्पष्ट सूचना दिल्या.गावातील १५० कुटुंबांना तातडीने किराणा किट वाटप करण्यात आले.

ग्रामस्थांनी उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्याकडे बाणगंगा व रामगंगा नदीवर मोठा पूल बांधण्याची,तसेच घर व शेतीचे पंचनामे करून त्वरित नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. श्री.शिंदे यांनी या मागण्यांवर बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले.यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते आपत्तीग्रस्तांना जीवनावश्यक वस्तू,ब्लँकेट्स व किराणा किटचे वाटप करण्यात आले.

या दौऱ्यात आमदार तानाजी सावंत, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक रितू खोखर,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी महादेव आसलकर यांच्यासह जलसंपदा, कृषी,पाटबंधारे व आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## शासकीय अनुदानित रक्कम कर्ज खात्यात कपात करू नका... रामलिंग पुराणे यांच्या अर्जाची तहसीलदार यांनी घेतली दखल

मुरूम (प्रतिनिधी)- येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेच्या व्यवस्थापकास दरवेळी शासनाच्या नवीन तारखेच्या आदेशाची गरज असते, त्यामुळे ते शेतकऱ्यांचे शासकीय अनुदानित रक्कम कर्ज खात्यात कपात करून घेतात किंवा खाता होल्ड वर ठेवतात आणि शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक देऊन हाकलून देत असतात. सदरील विषयी सामाजिक कार्यकर्ते तथा बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष रामलिंग पुराणे यांनी तीन वेळा नवीन तारखेचे पत्र आणून दिले आहेत, परत आता यांना आजच्या तारखेचे पत्र द्या म्हणून शेतकऱ्यांचे अडवणूक करत आहेत. याबाबत पुराणे यांनी दि.१८ सप्टेंबर २०२५ रोजी तहसीलदार उमरगा यांच्या कडे तक्रार दाखल केली होती.

मुरूम व परिसरातील शेतकऱ्यांचे मुरूम येथील बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत खाते असून सदरील खात्यावर प्रधानमंत्री किसान सन्मान योजना आणि पीक अनुदान,ड्रीप योजना यासह अनुदानित रक्कम शासनाकडून वर्ग करण्यात आले आहेत परंतु सदरील बँकचे व्यवस्थापक प्रधानमंत्री सन्मान योजना आणि पीक अनुदान,ड्रीप योजना यासह शासकीय योजनेतील रक्कम शेतकऱ्यांना देत नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास होत आहे, सदरील वरील योजनेचा रक्कम कर्जात जमा करून घेतले आहेत असे सांगून शेतकऱ्यांना हाकलून देत आहेत, यापूर्वीही असाच प्रकार झाला होता त्यावेळी मा.जिल्हाधिकारी आणि तहसीलदार साहेब यांच्याशी चर्चा करून व त्यांच्या पत्रानुसार कांही शेतकऱ्यांना रक्कम दिले परंतु आता परत आजच्या तारखेच्या पत्राची मागणी बँकेतून केली जात आहे. त्यांच्या खात्यावरील जमा असलेले प्रधानमंत्री सन्मान योजना व पीक अनुदान रक्कम, ड्रीप योजना रक्कम यासह अनुदानित रक्कम शेतकऱ्यांना देण्यास बँक व्यवस्थापक टाळा टाळा करत आहेत.

अर्जाची तात्काळ दखल घेऊन शेतकरी बांधवना न्याय मिळवून द्यावे ही असे विनंती निवेदन रामलिंग पुराणे यांनी तहसीलदार गोविंद येरमे यांच्याकडे पाठवले होते.

सदरील निवेदनाची तहसीलदार गोविंद येरमे यांनी दखल घेऊन पी.एम. किसान योजनेअंतर्गत व या कार्यालयामार्फत देण्यात येणारे विविध अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना वाटप करण्यात यावी, सदर अनुदान रकमेतून शेतकरी यांच्याकडील कर्जाची वसुली करण्यात येऊ नये, यापुढून अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना वाटप करण्यात यावे असे पत्र बँक ऑफ महाराष्ट्र मुरूम शाखा व तालुक्यातील सर्व बँकाना दि.२४ सप्टेंबर रोजी पाठवून निर्देश देण्यात आले आहेत.

> शेतकरी बांधव अतिवृष्टी मुळे संकटात आहे, शासकीय योजनेचे रक्कम बँकेत अडकले आहेत, ती देण्यास बँका टाळाटाळ करीत असल्याने अनेक शेतकरी बांधवाचे पैसे खात्यात अडकून आहेत, ती रक्कम मिळाली तरी शेतकऱ्यांना तात्पुरती अडचण तरी दूर होईल, बँकाना दरवर्षी नवीन पत्र पाहिजे असे म्हणतात. त्यामुळे तहसीलदार यांच्याकडे तक्रार नोंदवली होती त्यांनी तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय दिला त्याबद्दल त्यानाचे मनस्वी आभार.शेतकरी बांधवाना विनंती आहे निदान आपले कर्ज खाते चालू खाते तरी करून घ्या ही विनंती...
>
> **-रामलिंग पुराणे**
> **समाजसेवक तथा अध्यक्ष बसव प्रतिष्ठाण**

## धाराशिव जिल्हा आविष्कार स्पर्धेत पंचवीस महाविद्यालयांचा सहभाग



धाराशिव, दि.२४: महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देणारा उपक्रम म्हणजे आविष्कार आहे, असे प्रतिपादन सोलापूर येथील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र संचालक डॉ. राजीव मराठे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि येथील श्रीकृष्ण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी जिल्हास्तरीय आविष्कार नवोपक्रम आणि संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सोलापूर येथील डॉ. राजीव मराठे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड होते तर श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विभावरी शाईवाले, उपाध्यक्ष प्रभाकर हिरवे ,सहसचिव मंदाकिनी पाटील, संचालक डॉ. सागर पतंगे, विद्यापीठ आविष्कार समन्वयक डॉ. भास्कर साठे, विद्यापीठ युनिक संचालक डॉ. प्रवीण यन्नावार, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम, डॉ. प्रशांत दिक्षित, डॉ. ओमप्रकाश जाधव, डॉ. प्रभाकर उंदरे, डॉ. नितीन पडवळ, डॉ. राम कदम, डॉ. जगदीश नन्नवरे, डॉ. एम. जी. अंबुसे आदीची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेत जिल्ह्यातील पंचवीस हून अधिक महाविद्यालयांनी सहभाग घेतला. स्पर्धेत विद्यार्थिनींचा सहभाग लक्षणीय होता. एकूण सहा विभागांत प्रकल्प व संशोधन संकल्पना सादर झाले. मानव्यविद्या आणि ललित कला विभागात वेठबिगारी, महिलांचे आरोग्य, भाषा कौशल्य, मतदार जागृती, प्लॅस्टिक पर्याय, शाश्वत शेतीसारखे विषय मांडले. तर सायबर सुरक्षा, सौर वाहन तंत्रज्ञान, महिला सुरक्षा उपकरणे, कचरा पुनर्वापर यांसारख्या विविध विषयांवर २१० संशोधन विद्यार्थ्यांनी सादर केले. जिल्हा समन्वयक डॉ. राम कदम यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आसिया चिश्ती यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मल्लमा अंबुसे यांनी आभार मानले. या स्पर्धेतील प्रत्येक विभागातून बेस्ट ऑफ श्री सादरीकरण केलेले विद्यार्थी विद्यापीठीय स्तरावर होणाऱ्या आविष्कार स्पर्धेकरीता निवड करण्यात आली.

## सरसकट मदत जाहीर, तरीही राणादादांचे परिश्रत आरोरात्र चालूच, ग्रामविकासमंत्री गोरे यांच्यासह बार्शी तालुक्यात नुकसानीची पाहणी



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-धाराशिव जिल्ह्यात १३ सप्टेंबरला रात्रभर मुसळधार पाऊस झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मित्रचे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजतिसिंह पाटील यांनी बाहेर पडून शेतकऱ्यांना धीर द्यायला सुरुवात केली होती. विविध भागांत जाऊन त्यांनी नुकसानीची पाहणी केली. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळवून दिली. या घोषणेच्या दुसऱ्या दिवशीही राणादादा यांनी बाहेर पडून पिकांच्या नुकसानीची पाहणी केली.

बार्शी तालुक्यातील गौडगाव, उपळे (ज), जामगाव आदी गावे धाराशिव तालुक्याला लागूनच आहेत. सोलापूरचे पालकमंत्री श्री. जयकुमार गोरे साहेब हे गुरुवारी या भागाच्या दौऱ्यावर होते. त्यांच्यासमवेत राणादादांनीही या भागातील पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. या परिसरातही सोयाबीनसह फळबागांचे अपरिमित नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे अभूतपूर्व संकटाचा सामना करत असलेल्या शेतकऱ्यांशी पालकमंत्री श्री. गोरे आणि राणादादांनी संवाद साधून त्यांना धीर दिला.

आपले महायुती सरकार शेतकरी बांधवांना कधीही वाऱ्यावर सोडणार नाही. नुकसान अभूतपूर्व असल्याने मदतही अभूतपूर्वच असायला हवी, अशी आपली आग्रही मागणी आहे. त्यानुसार सर्व निकष बाजूला सारत सरसकट मदतीबाबत राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी मोठी घोषणा केली आहे. अभूतपूर्व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मुख्यमंत्री फडणवीस साहेबांच्या घोषणेमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. आपले सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. सरसकट मदत मिळेपर्यंत आपला पाठपुरावा सुरूच राहील, असे पालकमंत्री श्री. गोरे, राणादादा यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले. यावेळी बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, शेतकरी बांधव उपस्थित होते.

**तुळजापूर तालुक्यातही राणादादांनी केली पाहणी**

मुख्यमंत्री महोदयांच्या सोबतचा औसा पाहणी दौरा केल्यानंतर आ.राणादादांनी लगेच तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा, होनाळा, बारुळ, बसवंतवाडी, येथे भेट देऊन अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. अतिवृष्टी आणि सततच्या मुसळधार पावसामुळे येथील शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांनी सर्व निकष बाजूला सारून सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत करण्यात येईल, अशी मोठी घोषणा केली आहे. आपले सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. सरसकट मदत मिळेपर्यंत आपला पाठपुरावा सुरूच आहे, अशा शब्दांत राणादादांनी शेतकऱ्यांना धीर दिला.

सोयाबीनचा यावर्षीचा पीक विमा मोठ्या प्रमाणात मिळू शकतो. पीक कापणी प्रयोग मात्र व्यवस्थित करून घेणे आवश्यक आहे. त्याबाबत प्रशासनाला सक्त सूचना दिल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी महादेव जाधव, आनंद कंदले, उमेश पाटील, निशिगंधा पाटील, अनिल बंडगर, गोविंद हुलवणकर यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

## धाराशिव येथे रविवारी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात दिव्यांग-शेतकरी हक्क मेळावा

धाराशिव (प्रतिनिधी)-राज्यातील दिव्यांग बांधव, शेतकरी, शेतमजूर यांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणारे प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी मंत्री बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली सध्या राज्यभरात हक्क यात्रा सुरू आहे. या यात्रेच्या अनुषंगाने दिव्यांग मार्गदर्शन मेळावा व शेतकरी हक्क मेळावा येत्या रविवार, २८ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह, नगरपालिका धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यात दिव्यांगांना मासिक पेन्शन सहा हजार रुपये मिळावी, शेतकऱ्यांना कर्जमुक्ती व सातबारा कोरा मिळावा, शेतमालाला हमीभाव मिळावा, ऊस, केळी, डाळिंब यांसारख्या उत्पादनांना योग्य दर मिळावा तसेच शेतमजूर व दिव्यांग बांधवांच्या विविध प्रश्नांवर चर्चा होऊन ठोस भूमिका मांडली जाणार आहे.

बच्चुभाऊ कडू यांनी गेल्या वीस वर्षांपासून दिव्यांगांच्या न्यायासाठी आंदोलन छेडले आहे. रायगड येथे तीन दिवस आमरण उपोषण, अमरावती मोझरी येथे सात दिवस आमरण उपोषण अशा संघर्षांच्या माध्यमातून त्यांनी दिव्यांग पेन्शन दीड हजारवरून अडीच हजार रुपयांपर्यंत वाढवून घेण्यास यश मिळवले. याचे संपूर्ण श्रेय बच्चू कडू यांच्या झुंजार नेतृत्वाला जाते.

या मेळाव्याकरिता संपर्कप्रमुख अमोलजी जगदाळे,प्रहार दिव्यांग संघटनेचे राज्याध्यक्ष धर्मेंद्र सातव, जिल्हा , मंगेश ठाकरे, जिल्हाप्रमुख वर्षद शिंदे तसेच बच्चू कडू यांच्या विचाराशी समविचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

परिसरातील दिव्यांग व्यक्ती, शेतकरी बांधव, शेतमजूर, ऊस उत्पादक, केळी व डाळिंब उत्पादक तसेच सर्व समाजघटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मेळाव्याला यशस्वी करावे, असे आवाहन प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष मयूर काकडे यांच्यासह जिल्हा, तालुका व शाखा पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## प्राण्यांना निर्दयपणे कत्तल करुन विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे मन्सुर जुना बसडेपो धाराशिव यांनी दि.२३.०९.२०२५ रोजी हजरत चौक वैराग नाका परिसर खिरणीमळा धाराशिव येथे अशोक लिलॅड मालवाहक मध्ये १६८० किलो गोवंशीय जातीचे जनावरांची कत्तल करुन जनावरांचे मांस विक्रीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना धाराशिव शहर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## संकटकाळात मदतीची गरज

राज्यात विशेष करून मराठवाड्यात पावसाने कहर केला. या पावसाने शेतकऱ्याचे जीवनच उद्धस्थ केले आहे असे म्हणणे चुकीचे ठरू नये कारण एक तर शेतीतील उभे हाती लागणारे पीक नष्ट झाली आहेत. त्यापेक्षाही मोठी हानी ही जमीनीची झाली आहे. जमीनीत पाणी सतत राहणार असल्याने जमीनीचा कस कमी होणार आहे. जमीन नापीक होण्याची शक्यता आहे. मराठवाडयातील जवळपास सर्वच जमीनीमध्ये अजूनही पाणी आहे. एक तर सर्व धरणे, नदी व नाले तुडुंब भरले आहेत. जमीनीत पाणी मुरण्याची क्षमता काही काळापर्यंत असते. आता जमीनीत पाणी मुरेल असे वाटत नाही. पाणीच-पाणी सर्वबाजूने असल्याने जमीनीचा पोत कमी होणार आहे. नापीक जमीन होण्याची भिती निर्माण झाली आहे. असे सर्व बाजूने शेतकरी संकटात सापडला आहे. मराठवाड्यातील बहुतांशी नागरिक शेती करतात. त्याच प्रमाणे फुले व फळबागा आहेत. मरावाड्यात जवळपास खरीप व रब्बी असे दोन पीक घेतली जातात. पावसाने हातचे आलेले खरीपाचेपीक निसर्गाने हिराऊन घेतले आहे. त्याच प्रमाणे शेतीतील पाण्याचा निचरा कसा होईल ही मोठी चिंता आहे. मुळात हातची खरीपाचे पीक गेल्याने आता रब्बीचे पीक हाती लागेल या आशेवर शेतकरी असले तरी शेतातील माती कडक वाळल्यावर त्याची मशागत करता येईल. गव्हू व हरभर ही प्रमुख पीक आहेत. याला फारसा पाऊस पाणी लागत नाही. आज पर्यंत असे आस्मानी संकट निर्माण झाले नव्हते. खुद राज्यातील जेष्ठ नेते शरद पवार यांनी माझ्या बघण्यात असे पावसाचे संकट पहिल्यांदाच आहे असे मत व्यक्त केले आहे. वास्तविक असे संकट पहिल्यांदाच राज्यात का निर्माण झाले त्यातल्या-त्यात मराठवाड्यात असे संकट का निर्माण झाली, याबाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. मुळात नैसर्गिक संकटे का निर्माण होतात यामागे कोणती कारणे असतात. एकतर निसर्गाच्या विरोधात काम केलेले असते. निसर्गाची जेंव्हा ऱ्हास करतो त्यावेळी निसर्ग मोठे संकट निर्माण करतो त्यापेक्षा हानी मोठ्या प्रमाणात होते ही बाब सर्वांना माहिती आहे. त्यामुळे याकडे जनतेची किंवा सरकारचे लक्ष नाही. काही बाबतीत कडक निर्बंधाची गरज आहे. त्याकडे दुर्लक्ष होते. निसर्ग हा जीवसृष्टिला मदत करणारा आहे. जीवसृष्टिच निसर्गाचा ऱ्हास करीत आहे. हा त्याचा परिणाम दिसून येत आहे. पावसाने मोठे नुकसान केले आहे. सरकार आता मदत करणार आहे. वास्तविक सरकार आपल्याच मर्यादेत मदत करेल. आता दसरा व दिवाळी ही मोठी सण कसे साजरा करावीत याची चिंता लागून राहीली आहे. भरघोष मदत होईलच असे नाही. त्यासाठी आता मराठवाड्यातील शेतकऱ्यासाठी काही समाजिक सेवाभावी संस्था त्याच प्रमाणे दानशुर व्यक्तींनी पुढे आले पाहिजे. शेतकऱ्यांनी सुद्धा हातावर हात घालून बसण्यापेक्षा राणात साचलेले पाणी कसे बाहेर काढता येईल याचा विचार करावा. हाताचे खरीप गेले आहे. रब्बीसाठी काही केल्यास हाती लागेल असे वाटत नाही. भाताची शेती ही मराठवाड्यात केली जात नाही. मराठवाड्यात ऊस बरोबर ज्वारी, गव्हा बरोबर अन्य पीक घेतली जातात. ती घेताना जे निसर्गाचे वातावरण दिसून येणे अपेक्षित असते ते असणे आवश्यक आहे. दररोज सकाळी आकाश निरभ्र दिसून येते तर दुपार नंतर पावसाच्या सरी कोसळतात, त्यामुळे यावर मात करणे आवघड आहे. माणसाचे जगणे काही तरी करतील मात्र जनावरांचे मोठे हाल होणार आहेत. जनावराना काय खायला घालावे हा मोठा प्रश्न आहे. सरकार तर जनावरे पाळून जोड धंदा करा असा संदेश देते. दुधासाठी जनावरे आवश्यक आहेत. शेळ्या, गायी व म्हशी हे सतत दावणीला बांधता येत नाहीत. पाण्यात ठेवता येत नाहीत. त्यांच्यासाठी सरकारने वेगळा निधी देण्याची गरज आहे. जनावरे जगवायाची झाली तर त्यांना हिरवा चारा कोठून आनायाचा? कडबा हा खरीपाच्या मोसमात मिळतो. खरीप तर हाताचे गेले आहे. त्यामुळे जनावरे जगविणे ही मोठी समस्या आहे. या बाबत सरकारने विचार करावा लागणार आहे. जनता देखिल काही प्रमाणात अविचारी आहे. एकनाथ शिंदे यांचे फोटो असणारे वाटपाचे पोती टेम्पोत आली त्याला विरोध? कशाला विरोध करावा, परिस्थिती काय दिसून येते याचा विचार करीत नाही. आज परिस्थिती जगाला तरच संकटावर मात करता येवू शकेल. नसता आगामी चार महिणे मोठी संकटाची आहेत. त्यात दसरा व दिवाळी हे मोठे सण आहेत. एकदा का दिवाळीचा सण संपला तर आगामी जवळपास सहा महिणे सण नसतात. त्यामुळे उरलेले दिवसावर कशा प्रकारे मात करता येईल याचा विचार केला पाहिजे. मुळात काही वेळा अविचाराने निर्णय चुकीचे ठरू शकतात. सध्याला या पाणी संकटातून बाहेर कसे पडता येईल याचा विचार करावा. सध्याला मोठ्या प्रमाणात निसर्गाचा ऱ्हास केला जात आहे हे पहिल्यांदा रोखले पाहिजे. निसर्गाला त्रास दिल्यास निसर्ग सोडणार नाही. हे सतत लक्षात ठेवले पाहिजे. अनेक वर्षापासून ऋतूमान बदलत आहे. उन्हाळ्यात पाऊस पहिल्यांदाच झाला आहे. पुर्वी असे नव्हते. उन्हाळ्यात कडक उन्ह, पावसाळ्यात केवळ पाऊस व हिवाळ्यात केवळ थंडीच होती. आता तसे काही वर्षापासून दिसून येत नाही. ऋतूमान बदलाच्या संकटाने शहाणे होणे अपेक्षित होते. ते दिसून येत नाही. उलट स्वार्थापोटी निसर्गाचा ऱ्हास होत आहे. ते थांबविले पाहिजे. आगामी काळात शेतीत उत्पादन होईल असे वाटत नाही. शेतातील पाण्याचा निचरा कसा होईल व केंव्हा होईल हे सांगता येत नाही. त्यात सरकारने अतिवृष्टी भागात दौरा केला असून मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. ती मदत अपेक्षा पुर्ण करणारी किंवा संकटावर मात करणारी ठरणार का? मुळात तुटपुंजी मदत संकटावर मात करणारी ठरणारी असेल का? याचा विचार केला पाहिजे. त्यामुळे सरकारी मदत मिळेल यातच वेळ घालविण्यासाठी उरलेले काम हाती घ्यावे लागेल याचा विचार करावा व संकटावर मात करण्याची तयारी ठेवावी तरच जीवनाचा अर्थ आहे.

# शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय काँग्रेस शांत बसणार नाही; निलंग्यातील रास्तारोको आंदोलनात अभय साळुंके यांचा इशारा

**निलंगा/प्रतिनिधी :** मागच्या एक महिन्यापासून दररोजच्या मुसळधार पाऊस आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मातीसह पिक वाहून जाऊन जमीनी नापिक बनल्या आहेत. अशा परिस्थितीत खचून गेलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तुटपुंजी मदत देण्याऐवजी सरसकट ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना भरघोस मदत द्यावी अशी मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी भाजपचे गुत्तेदार कार्यकर्ते शेतकरी म्हणून नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर उभा करुन निलंग्याच्या आमदारांनी मुख्यमंत्र्यांचीच फसवणूक केल्याचा सरशंधान साळुंके यांनी साधला. शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय काँग्रेस शांत बसणार नाही असेही त्यांनी सांगितले.

निलंगा विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण लातूर जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित रास्तारोको आंदोलनात अभय साळुंके बोलत होते. खरीप हंगामातील पिकांचे १०० टक्के नुकसान झाले असतानाही प्रति हेक्टर ८५०० रुपये एनडीआरएफच्या नावाखाली सरकारने तुटपुंजी मदत जाहीर करुन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा काम केले आहे. निवडणुकीच्या आगोदर एनडीआरएफच्या नियमात बदल करुन हेक्टरी १३६०० रुपये मदत तीन हेक्टर पर्यंत जाहीर करण्यात आली होती. आता यांच्या निवडणूका संपताच एनडीआरएफचे नियम बदलून मदत दोन हेक्टर पर्यंत ८५०० करण्यात आली. एक एकर सोयाबीन काढणीसाठी मंजूर ८००० हजार रुपये घेत आहेत. सरकारने जाहीर केलेल्या मदतीमध्ये एक एकर सोयाबीनही शेताच्या बाहेर निघणार नसल्याने जाहीर केलेल्या मदतीचा निषेध करत सरसकट ओला दुष्काळ जाहीर करुन किमान एक लाख



रुपये हेक्टरी मदत, मनुष्यहानी झालेल्या कुटुंबाला १० लाख रुपये मदत द्यावी, अतिवृष्टीत वाहून गेलेले रस्ते व पूल तात्काळ दुरुस्त करावेत, गतवर्षी फुटलेले मसलगा मध्यम प्रकल्प व हाडगा लघू प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम मार्गी लावावे आदी मागण्या करण्यात आल्या. मुख्यमंत्र्यांनी औराद शहाजानी येथे पाहणी दौरा केला. त्या दौऱ्यात शेतकऱ्यांना बोलू न देता भाजपचे कार्यकर्ते शेतकरी म्हणून उभा करण्यात आले. खऱ्या शेतकऱ्यांची यांना भीती वाटते का? असा प्रश्न उपस्थित करत औराद शहाजानी येथील महिला सरपंच निवेदन देण्यासाठी आल्या होत्या त्यांना भेटू दिले नाही या घटनेचा अभय साळुंके यांनी निषेध करत शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी काँग्रेस कायम लढत राहील असा शब्द त्यांनी उपस्थितांना दिला. जवळपास दोन तासाच्या रास्तारोको आंदोलानंतर प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

यावेळी माजी तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष अरविंद भातांबरे,सुधाकर पाटील, अजित माने, हमीद शेख, पंकज शेळके, अजित नाईकवाडे, विठ्ठल पाटील, ॲड नारायण सोमवंशी, बालाजी गोमसाळे, महेश देशमुख, शकील पटेल, विठ्ठल पाटील, रमेश मदरसे, ॲड संदीप मोरे, ॲड तिरुपती शिंदे, मुजीब सौदागर, मदन बिरादार, गंगाधर चव्हाण, शाहीद लाला पटेल, विकास पाटील, दिनकर निटुरे, सिराज देशमुख, अजगर अन्सारी, किशोर कारखाने, दत्ता जाधव, हभप संदीपान महाराज वाघमारे, धनाजी चांदूरे, अपराजित मरगणे, माधवराव पाटील, हाजी सराफ, पद्मसिंह पाटील, किरण पाटील, गिरीश पात्रे सह आदी उपस्थित होते....

# मनपा इतिहासात पहिल्यांदाच शहर अभियंता पदावर महिला अधिकारी

## नवरात्री मध्ये नियुक्ती करून प्रशासनाने दिला संदेश

## मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांचा ऐतिहासिक निर्णय

लातूर /प्रतिनिधी : लातूर शहर महानगर पालिका अंतर्गत विविध विभागात अनेक महिला अधिकारी कर्मचारी कार्यरत आहेत . व त्याना दिलेले जबाबदारी सक्षमपणे पार पाडत आहेत. नुकतेच आयुक्त पदी सुध्दा श्रीमती मानसी यांची नियुक्ती शासनाने केली आहे व त्या लातूर महानगरपालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त म्हणून सक्षमपणे कार्यरत आहेत. नुकतेच शहर अभियंता हे पद रिक्त झाल्याने मनपा सेवेतील सेवाजेष्ट अभियंता असलेल्या श्रीमती उषा काकडे यांची शहर अभियंता पदी नियुक्ती मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केली आहे . ऐन नवरात्री मधे महापालिकेतील शहर अभियंता सारख्या जबाबदार पदाचा कारभार महिला अधिकारी यांच्या कडे सोपवून महिला सक्षमीकरणाचा संदेश मनपा प्रशासनाने दिला आहे. श्रीमती उषा काकडे यांनी शहर अभियंता पदाचा पदभार स्वीकारून कामास सुरुवात केली आहे याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांच्या सह अधिकारी कर्मचाऱ्यांनी श्रीमती उषा काकडे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# एक दिन एक घंटा एक साथ स्वच्छता

## संकल्पनेतर्गत **एनसीसी** विद्यार्थ्यांचा स्वच्छतेचा संकल्प





**लातूर/ प्रतिनिधी :** देशभरात राबविण्यात येणाऱ्या ''एक दिन एक घंटा एक साथ स्वच्छता'' या संकल्पनेला प्रतिसाद देत दयानंद कला महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सनी परिसर स्वच्छता उपक्रम हाती घेतला. या उपक्रमामध्ये दयानंद गेट समोरील परिसर, आजूबाजूचा भाग तसेच रस्त्याच्या कडेला साचलेला कचरा हटवून स्वच्छतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड आणि एनसीसी अधिकारी सीटीओ डॉ शिवकुमार राऊतराव यांच्या उपस्थितीत सकाळी ९ ते १० या ठरलेल्या वेळेत करण्यात आले. यामध्ये प्राचार्यांनी स्वच्छतेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर कॅडेट्सनी झाडाझडती, कचरा गोळा करणे, प्लास्टिक वेगळे करून ठेवणे, गवत काढणे अशा विविध कामांतून परिसर सुंदर व स्वच्छ करण्यासाठी योगदान दिले. कॅडेट्सनी या उपक्रमाद्वारे ''स्वच्छ भारत अभियान'', ''स्वच्छता हीच सेवा'' व ''माझे कर्तव्य माझी जबाबदारी'' याचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी एक तास समाजहितासाठी श्रमदान



करून ''स्वच्छतेतूनच आरोग्य आणि प्रगती साधता येते'' हे दाखवून दिले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प घेतला. प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरातील स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारली, तर समाजात मोठा बदल घडू शकतो यावर सर्वांनी एकमत नोंदवले. या उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य डॉ अंजली जोशी, समन्वयक डॉ. संतोष पाटील, प्राध्यापक, एनसीसी अधिकारी, २९ कॅडेट्स तसेच इतर विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन त्यांना ''स्वच्छतेचा सैनिक'' बनण्याची प्रेरणा मिळाली.

# हिंदी भाषा ही विश्वव्यापी भाषा – डॉ.गोपाल बाहेती

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात हिंदी दिवस उत्साहात साजरा



**लातूर/ प्रतिनिधी :** मातृभाषा मराठी,राष्ट्रभाषा हिंदी व जागतिक भाषा इंग्रजी या तिन्ही भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण असून दैनंदिन व्यवहारात हिंदी भाषेचा जास्तीत जास्त वापर झाला पाहिजे.हिंदी भाषा ही राष्ट्रीय एकात्मता,अखंडता व अस्मितेचे प्रतीक आहे.ती समाजव्यवहाराचे प्रभावी माध्यम असून रोजगाराभिमुख भाषा आहे.आपल्या मनातल्या सुख-दुःखाच्या भावना,विचार प्रकटीकरणाचे सर्वोत्तम माध्यम आहे. कारण हिंदी भाषेच्या माध्यमातून केवळ भारतातच नाही तर जागतिक पातळीपर्यंतही आपण संवाद साधू शकतो.हिंदी भाषा ही जन,मन व धनाची ताकदीची भाषा आहे.हिंदी भाषा संस्कृती संवर्धनाचे व संस्काराचे सशक्त माध्यम आहे.हिंदी भाषा व साहित्यात ज्ञानाचे अवाढव्य भांडार आहे.अशा या हिंदी भाषेचा जास्तीत-जास्त प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे. आज मराठी,इंग्रजी भाषेतील अनेक शब्द हिंदी भाषेत आले असून भाषिक संक्रमण वाढते आहे.तरी ती सक्षम भाषा आहे.अशा या हिंदी भाषेचा सर्वांनी आदर व सन्मान केला पाहिजे.कारण ती विश्वव्यापी भाषा आहे,असे प्रतिपादन दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयातील डॉ.गोपाल बाहेती यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभागाच्या वतीने दि.२४ सप्टेंबर २०२५ रोजी हिंदी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित होत्या.याप्रसंगी हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ. रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना प्रा.मेघा पंडित यांनी मातृभाषा मराठी,राष्ट्रभाषा हिंदी आणि जागतिक भाषा इंग्रजी या तिन्ही भाषा भगीनी असून या तिन्ही भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे,असे त्यांनी सांगितले.प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने यांनी केले तर आभार शेख नाजरीन या विद्यार्थीनीने मानले.प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रा.शैलेश सूर्यवंशी यांनी करून दिले.सूत्रसंचालन शेख सौलेहा व सय्यद लोहेपा या विद्यार्थीनींनी संयुक्तरित्या केले.याप्रसंगी सुजित अपसिंगेकर,सुनील राक्षे,राजेसाहेब पांचाळ यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मस्त मजेचे आई – बाबा विषयावर पालकांशी अतुल कुलकर्णी यांनी साधला सुसंवाद

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा अभिनव उपक्रम

**लातूर/ प्रतिनिधी :** येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मस्त मजेचे आई – बाबा ( माझं मूल कसं घडवायचं ? या प्रवासाची गोष्ट ) या विषयांवरील कार्यक्रमात दैनिक लोकमतच्या मुंबई आवृत्तीचे संपादक अतुल कुलकर्णी यांनी पालकांशी सुसंवाद साधून त्यांना सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. आई – वडील बनणे सोपे असते, पण मुलांचे मित्र बनणे अतिशय अवघड असल्याचे मत त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ पत्रकार अतुल कुलकर्णी यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, सदस्य डॉ. ओमप्रकाश भोसले यांनी स्वागत केले. त्याचप्रमाणे सौ. दीपा अतुल कुलकर्णी, आनंद कुलकर्णी, अनघा कुलकर्णी, गार्गी कुलकर्णी यांचाही संस्थेच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना अतुल कुलकर्णी यांनी मुलं आणि आई –वडिलांमधील संबंधांवर अगदी सहज – सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. मुले आणि आई वडिलांमध्ये संवाद असणे अतिशय महत्वाचे आहे. मुलांच्या भावना, समस्या समजून घेऊन त्या मुलांना समजतील अशा पद्धतीने समजावून सांगणे आई – वडिलांचे कर्तव्य असते. त्याशिवाय मुलांचे भवितव्य व्यवस्थित घडविले जाऊ शकत नाही. आपल्या कामाच्या व्यापात बऱ्याचदा इच्छा असूनही बहुसंख्य पालक मुलांकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नाहीत. पालकांनी मुलांवर आपली मते सक्तीने लादण्याचा प्रयत्न करू नये. मुलांच्या कलाप्रमाणे त्यांना समजून घेणे गरजेचे आहे. एखादेवेळी मुलांचा निर्णय चुकत असेल तर त्यांना न रागावता तो जे काही करू इच्छितोय ते कसे योग्य नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण आपल्या भावना – मत कशा प्रकारे व्यक्त करतो त्याचाही चांगला – वाईट परिणाम मुलांवरच नाही तर प्रत्येकावर होत असतो. आई –वडील होणे अतिशय सोपे आहे. पण, मुलांचे मित्र होणे अतिशय अवघड असते. मुलांसोबत मित्रत्वाचे संबंध निर्माण होणे महत्वाचे असल्याचेही कुलकर्णी यांनी सांगितले. मुलांना घडविणे पूर्वतः पालकांच्या हाती असते, मात्र त्यासाठी त्यांच्या कलाने चालले पाहिजे, हे सांगताना अतुल कुलकर्णी यांनी हिंदी चित्रपटातील काही दृश्यांच्या माध्यमातून पालक – विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत पटवून दिले. मनोरंजनाच्या माध्यमातूनही जटिल विषय सोपा करून सांगणे, पटवून देणे शक्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आजचे विश्व व्यापक झाले आहे. प्रत्येक पालकाला आपल्या मुलांचे भवितव्य उज्वल व्हावे असे वाटणे साहजिक आहे. त्याकरिता मुलांशी मित्रत्वाचे, प्रेमाचे संबंध असणे खूप आवश्यक असल्याचे अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा यांनी यावेळी बोलताना श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अतुल कुलकर्णी यांचे शिक्षण लातूरच्याच राजस्थान विद्यालयात झाले असून त्यांचे आणि आपले अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध नमूद





केले. अतुल कुलकर्णी यांच्या सिद्धहस्त लेखणीने आपण प्रभावित झाल्याचेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विस्तृतपणे विशद केली. मुख्याध्यापक स्वामी यांनी अतुल कुलकर्णी यांचा परिचयही करून दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती गोवंडे यांनी तर आभार प्रदर्शन रमाकांत स्वामी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांसह सर्व शिक्षक – शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# तुम्ही अजूनही प्लास्टिकचा चॉपिंग बोर्ड वापरता का? आजच वापर बंद करा नाहीतर...

मुंबई : स्वयंपाकघरात सर्रास वापरले जाणारे प्लास्टिकचे चॉपिंग बोर्ड आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकतात. एका नवीन संशोधनातून समोर आले आहे की, प्लास्टिकच्या चॉपिंग बोर्डवर भाजी किंवा फळे चिरताना त्याचे छोटे-छोटे कण (मायक्रोप्लास्टिक्स) अन्नात मिसळतात, जे आरोग्यासाठी गंभीर धोके निर्माण करतात. संशोधनानुसार, जेव्हा आपण प्लास्टिकच्या चॉपिंग बोर्डवर चाकूचा वापर करतो, तेव्हा घर्षणाने त्याचे लहान-लहान प्लास्टिक कण तयार होतात. हे



कण अगदी लहान असल्यामुळे डोळ्यांना दिसत नाहीत आणि अन्नात सहज मिसळतात. हे मायक्रोप्लास्टिक्स कण अन्नासोबत आपल्या शरीरात जातात आणि रक्ताभिसरण प्रणालीमध्ये प्रवेश करतात. शरीरात एकदा प्रवेश केल्यानंतर, हे कण अनेक गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकतात. यामुळे शरीरातील अंत:स्रावी प्रणालीवर (एपवेलीळपश ड्रींशा) परिणाम होतो. पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या कमी होणे आणि महिलांमध्ये प्रजननक्षमतेवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.हृदयविकार आणि मधुमेह यांसारख्या गंभीर आजारांचा धोकाही वाढतो. प्लास्टिकच्या चॉपिंग बोर्डमध्ये असलेले बीपीए (इझ-) नावाचे रसायन आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असते.पर्याय आणि खबरदारी प्लास्टिकच्या चॉपिंग बोर्डऐवजी लाकडी किंवा बांबूच्या चॉपिंग बोर्डचा वापर करणे अधिक सुरक्षित आहे.

# या भाज्या खाल्ल्यास आयुष्यभर राहाल निरोगी

मुंबई: आजच्या धकाधकीच्या जीवनात निरोगी राहणे हे मोठे आव्हान बनले आहे. अयोग्य खाणेपिणे आणि वाढता ताण यामुळे अनेक लोक विविध आजारांना बळी पडत आहेत. मात्र, तज्ज्ञ डॉक्टरांनी काही महत्त्वाच्या भाज्यांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला दिला आहे, ज्यामुळे तुम्ही दीर्घकाळ निरोगी आणि रोगमुक्त राहू शकता. पोषणतज्ज्ञांच्या मते, आपल्या रोजच्या जेवणात काही खास भाज्यांचा समावेश केल्यास शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि अनेक गंभीर आजारांपासून बचाव होतो. या भाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स, फायबर, व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स असतात, जे शरीरासाठी खूप फायदेशीर आहेत. निरोगी राहण्यासाठी 'या' भाज्यांचा आहारात समावेश करा:



पालक: पालकामध्ये भरपूर लोह, व्हिटॅमिन 'ए' आणि 'के' असते. यामुळे रक्त वाढण्यास मदत होते आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते.

ब्रोकोली: यामध्ये फायबर आणि व्हिटॅमिन 'सी' मोठ्या प्रमाणात असते, जे हृदयासाठी चांगले आहे आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांपासून बचाव करण्यास मदत करते.

गाजर: गाजर हे व्हिटॅमिन 'ए'चा उत्तम स्रोत आहे, ज्यामुळे दृष्टी सुधारते. तसेच, त्यात फायबर असल्याने पचनसंस्थेचे कार्य सुधारते.

कोबी: कोबीमध्ये व्हिटॅमिन 'के' आणि 'सी' तसेच फायबरचे प्रमाण अधिक असते, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवते.

लसूण आणि आले: हे दोन्ही नैसर्गिक अँटीबायोटिक्स मानले जातात. यांचा नियमित वापर केल्यास सर्दी-खोकल्यासारखे आजार दूर राहतात.टोमॅटो: टोमॅटोमध्ये लाइकोपीन नावाचे अँटीऑक्सिडंट असते, जे त्वचेच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. फक्त भाज्या खाणे पुरेसे नाही, तर त्या योग्य पद्धतीने शिजवणेही महत्त्वाचे आहे. जास्त भाजल्याने किंवा शिजवल्याने त्यांचे पोषक घटक नष्ट होऊ शकतात. त्यामुळे भाज्यांचा वापर सॅलड, सूप किंवा कमी तेलात शिजवून करणे अधिक चांगले. या सोप्या टिप्स फॉलो करून तुम्ही अनेक गंभीर आजारांपासून स्वतःचे संरक्षण करू शकता.

# विनाशक वृष्टी







नैसर्गिक संकट कोणी रोखू शकत नाही हे खरे आहे. मात्र अशा संकटकाळासाठी आर्थिक तरतूद करणे हे सरकारचे काम असते. पण सत्ता मिळवणे व ती जपणे यात गुंतलेल्यांना तो विवेक उरलेला नाही. गेल्या सुमारे आठवडाभर महाराष्ट्राच्या अनेक भागात झालेल्या पावसाने जनतेला दिलासा देण्याऐवजी दणका दिला आहे. विशेषत: विदर्भ आणि मराठवाड्याला पावसाने अक्षरश: झोडपून काढले आहे. पावसाने या भागात माणसांचे बळी जाणे ही धक्कादायक घटना अभूतपूर्व म्हटली पाहिजे. सोलापूर, धाराशिव (पूर्वीचा उस्मानाबाद), लातूर या जिल्ह्यांनाही पावसाचा तडाखा बसला आहे. अनेक दशकात न पाहिलेला प्रचंड पाऊस यंदा अहल्यानगर (पूर्वीचा अहमदनगर) जिल्ह्याने या वर्षी पाहिला. राज्यातील खरिपाच्या पिकांचे, फळबागांचे या पावसाने अतोनात नुकसान झाले आहे. त्याची आकडेवारी हळूहळू समोर येत आहे. त्या आकड्यांमधून ज्यांचे पीक गेले त्या शेतकर्यांची दुरवस्था समजत नाही, त्यांचे जीवनच उद्ध्वस्त झाले आहे. अनेक छोटे-मोठे व्यावसायिक, दुकानदार यांचेही या पावसाने नुकसान झाले आहे. घरांत पाणी घुसल्याने सामान्य नागरिकांच्या हालास पारावार उरला नाही. रस्ते जलमय झाल्याने अनेक भागातील वाहतूक बंद पडली. नाशवंत मालाची वाहतूक न झाल्याने तो खराब झाला, त्यामुळेही अनेक व्यावसायिकांचे नुकसान झाले. या सर्व नुकसानीची मोजदाद करणे अत्यंत कठीण काम आहे. पण सरकारला ते करावे लागेल. सरकारही येथे हतबल झाले आहे.

नियोजनाची गरज

या वर्षी मे महिन्यापासूनच पावसाळा सुरू झाला असे म्हणण्यासारखी स्थिती आहे. त्या वेळी अवकाळी ठरलेल्या पावसाने शेतीचे काही प्रमाणात नुकसान झाले. मात्र वेळेत मान्सून सुरू होईल व त्यामध्ये हे नुकसान भरून निघेल अशी आशा होती. जून-जुलैतील संततधार पावसाने यंदा वेळेआधी अनेक धरणे भरली. सोलापूर जिल्ह्यातील उजनी व मराठवाड्यातील जायकवाडी ही मोठी धरणे लवकर भरल्याने पाणी टंचाई जाणवणार नाही असे समाधान सर्वत्र पसरले होते. पण त्या नंतरही पाऊस सुरूच राहिल्याने आशेची जागा चिंतेने घेतली. या वर्षी पावसाचे वितरण समान नाही. कोकण विभागात सरासरीच्या ९० टक्के, पुणे विभागात सरासरीच्या ८२.६ टक्के पाऊस झाला. दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणार्या मराठवाड्यात सरासरीच्या १२९ टक्के पाऊस झाला. मराठवाड्यातील शेकडो गावांत पूर आल्याने सुमारे २ लाख २२ हजार १६४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अन्य एका अंदाजानुसार या भागातील १२ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. गेल्या दोन-तीन दिवसांतील अतिवृष्टीने पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांमधील पिकांचे जास्त नुकसान झाल्याचे सरकारने म्हटले आहे. कापूस व सोयाबीन ही या भागातील मुख्य पिके आहेत. ती अक्षरश: मातीत गेली आहेत. पुरात मालमत्ता व जनावरे वाहून गेल्याने नुकसान अधिक वाढले आहे. त्याची माहिती घेणे, पंचनामे करणे हा सोपस्कार सरकारतर्फे पार पाडला जाईल. नंतर मदत जाहीर होईल. ती अपुरी असणार यात शंका नाही. राज्य सरकार मदतीसाठी केंद्राकडे याचना करेल. एकच आघाडी दोन्हीकडे सत्तेत असली तरी पैसे कसे उभे करणार हा प्रश्न मोठा आहे. निर्यात घटत असल्याने उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे केंद्र सरकारचे उत्पन्नही घटण्याचा धोका आहे. सणासुदीच्या काळात मागणी वाढावी यासाठी केंद्राने 'जीएसटी' च्या दरात बदल केले. अल्पकाळासाठी त्याचा फायदा दिसेलही, पण त्याने दीर्घकालीन उत्पन्न वाढेल याची खात्री नाही. सध्या दोघांकडेही पैसे नाहीत हे वास्तव ते मान्य करणार नाहीत. आर्थिक नियोजनाचा बोजवारा उडाला आहे. मोफतच्या योजनांमुळे तिजोरीवर ताण येईल या अर्थ विभागाच्या इशार्याकडे दुर्लक्ष करून मते मिळवण्यासाठी अशा योजना सुरू झाल्या. त्याने सत्ता मिळाली पण कर्जाचा बोजा वाढला. शेतकर्यांना मदत देण्यासाठी हजारो कोटी रुपये लागतील ते कोठून येणार? ज्या व्यावसायिकांचे पावसाने नुकसान झाले त्यांनीही मदत मागितल्यास नाकारता येणे अवघड आहे. पण ती देणार कशी? सर्व बाजूंनी विनाश करणारी ही वृष्टी ठरली आहे. त्यातून मार्ग काढणे अवघड आहे.

# निष्ठेचा परिणाम फार



भगवंतावर पूर्ण निष्ठा ठेवून प्रपंचात आपले कर्तव्य केले, तर आम्हाला केव्हाही दु:ख करण्याची वेळ येणार नाही. आमच्याकडे आठवड्याचा बाजार असतो. एक नवरा-बायको असे बाजाराला गेले होते. संध्याकाळ झाली. त्यांचे घर फार लांब होते. ती दोघे आपसांत बोलत होती की, आता उशीर झाला आहे, रात्रीचे जाणे नको. तेव्हा आज इथेच राहू आणि सकाळी जाऊ. त्यांचे बोलणे दोन लबाड माणसांनी ऐकले. ते त्यांना म्हणाले, तुम्ही का घाबरता? आम्ही बरोबर आहोत ना! आम्हाला तुमच्या पुढच्या गावाला जायचे आहे. आम्ही रामासाक्ष सांगतो, आहो तेव्हा आपण जाऊ या. या नवरा-बायकोला ती माणसे वाईट आहेत, असे वाटले नाही. पुढे एका दरीत गेल्यावर, त्या लोकांनी त्या बाईच्या नवऱ्याला झाडाला बांधले आणि त्या बाईच्या अंगावरचे दागिने काढून घेतले. पुढे त्या बाईच्या पदराला हात लावताच ती बाई रामाचा धावा करून म्हणाली, रामा! मी या लोकांच्या विश्वासावर आले नाही, त्यांनी तुझी साक्ष ठेवली, तुझी शपथ वाहिली, त्या शपथेच्या विश्वासावर मी आले. माझे रक्षण करणारा आता तूच आहेस! एवढ्यात बंदुकीचे आवाज झाले आणि दोन शिपाई तिथे धावत आले. तेव्हा चोर पळून गेले आणि त्या शिपायांनी त्यांना मुक्त केले, त्यांचे दागिने आणि सामान त्यांना दिले आणि त्यांना घरी पोहोचवले.घरी गेल्यावर ती बाई म्हणाली, तसे जाऊ नका, थोडे गूळपाणी घेऊन जा. ते म्हणाले, नको, आम्हाला फार कामे आहेत. ती म्हणाली, थांबा जरा, मी आत्ता आणतेच. म्हणून ती आत वळली, तेवढ्यात ते गुप्त झाले. निष्ठा ही अशी पाहिजे. आजवर कितीकांच्यावर किती बिकट प्रसंग आले असतील; परंतु त्यांच्या निष्ठेमुळेच ते त्यातून पार पडले. सगुणभक्तीचा जर काही मोठा फायदा असेल, तर तो हा की, जेव्हा आपण रामाच्या पायावर डोके ठेवतो, तेव्हा आपल्या भावना उचंबळून येतात. अशा वेळी आपण रामाला सांगावे, रामा, आता तुझ्याशिवाय मला कोणी नाही. मला तू आपलासा करून घे. मी अवगुणी असेन, पण तू माझा अव्हेर करू नकोस, मी तुला शरण आलो आहे. आपल्या स्वभावामध्ये भगवंताच्या श्रद्धेपासून उत्पन्न झालेला धिमेपणा म्हणजे धीर पाहिजे. जो भगवंतावर निष्ठा ठेवील, त्याच्यावर साऱ्या जगाची निष्ठा बसेल, लोक देवालासुद्धा बाजूला करतात आणि अशा निष्ठावान मनुष्याला भजतात. निष्ठेचा परिणाम फार आहे. भगवंतावर पूर्ण निष्ठा ठेवून प्रपंच करा, तो खात्रीने सुखाचा होईल.

-अध्यात्म : ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज

## सखी : मासिक पाळी — डॉक्टर टीप्स

यापुढेही समाजात मासिक पाळीविषयी अधिक प्रसार होणे गरजेचे आहे. त्यामुळे समाजात अधिक सकारात्मक वातावरण निर्माण होईल,' असं ती सांगते. ठाण्यात सखी ही संस्था शालेय विद्यार्थ्यांना मासिक पाळीविषयी माहिती देण्याचं काम करत आहे. 'या विद्यार्थ्यांना मासिक पाळीमुळे स्त्रियांच्या आयुष्यात होणाऱ्या बदलांची माहितीही देण्यात येते. त्याचबरोबर तज्ज्ञांच्या मदतीने या विषयाबद्दल मुलींसोबत मनमोकळा संवाद साधण्यात येतो. त्यामुळे मासिक पाळी हा गंभीर विषय मुलांना समजण्यास अधिक सोपा जातो. तसेच त्यांना योग्य वयात योग्य माहिती मिळते,' असे या संस्थेच्या डॉ. लता घनशामनी यांनी सांगितले.सध्या मासिक पाळीविषयी जागरूकता निर्माण करणारे विविध चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. अशा विविध चित्रपटांद्वारे मासिक पाळीविषयीचा समाजातील लाजरेपणा कमी झाला आहे.

(**क्रमश:**)



## विनोद





अरुण : कोंबडीला तू गरमागरम पाण्याने आंघोळ का घालतोस रोज रोज?

वरुण : तिने उकडलेले अंडे द्यावे म्हणून.

## संदेश

tere husn ki tapish jala na de mujhe,
tu kar mahobbat mujh se jara ahista ahista.

## सुविचार

सुखी होण्यासाठी सुखी होण्याचा मार्ग म्हणजे निसर्गावर, नियतीवर...परमेश्वरावर कोणावर तरी विश्वास ठेवा!




### संस्कृत सुभाषित

अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मन ः।।
(भीष्मपर्व, अध्याय २८, ४० महाभारत)

**अर्थ :** अज्ञ असून श्रद्धा न ठेवणारा असा संशयखोर मनुष्य सर्वथा नाश पावतो, अशा संशयात्म्याला ना इहलोक, ना परलोक, ना सुख.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. हत्तीवरीक बैठक
३. गरजू
७. हुक्की, लहर
१०. पाणी
११. जाणूनबुजून
१२. माणशी प्रमाण
१४. पाठवणी
१६. नकला करणारा
१७. मालक
१८. एक धान्यप्रकार, गहू-हरभरा डाळीचे एकत्र पीठ-त्याचे शिजवलेले पौष्टिक मिश्रण
१९. हात
२०. वेळ, अवधी
२१. शेतमळ्यांचा मालक
२४. म्हातारपण व मृत्यू नसलेला
२७. एक लाल कंदमूळ
२९. तळे
३१. प्रतिकूल स्थितीत झालेली पांगापांग
३४. बडबड
३७. किराणा व्यापारी
३८. वेल
४०. तड लागेपर्यंत (जेवणे)
४१. वर्ष, साल
४२. खंदक
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. बैलाच्या मानेवरील जोखड
४६. घट्ट बासुंदी
४८. पार्थिवावरचे वस्त्र
५०. नूतन, नवे
५२. श्वसनाचा अवयव
५३. लाकडाची एक उत्कृष्ट जात
५५. भांडण सोडवणारा मध्यस्थ
५७. जीभ
५९. दोन कानांचे तळण्याचे पात्र
६१. येरझार
६४. पार्वतीचे नाव
६५. पोते
६८. दिलेला ठराविक काळ
६९. दु:ख (हिंदी)
७०. प्रत्येक वर्षी
७१. बगीचा
७३. छोटी घागर
७५. बायको
७६. निमंत्रक (स्त्री)
७९. कच्चे लिखाण (इंग्रजी)
८१. रांग, पंक्ती
८२. घर
८३. वृक्षाच्या आधाराने वाढणारी
८४. उदर
८५. धपाटा
८६. मरुणझुणुच्या ---, जा रे माझ्या माहेराफ
८८. जमिनीखाली येणारे फळ
८९. निराळा
९०. छोटे कुबड
९१. फालतू सामान

### उभे शब्द

१. काजळ
२. लहान मूल
३. विश्वासघातकी
४. दारूचा प्रकार
५. नमनीय
६. छोटी होडी
७. सखी, मैत्रिण
८. करणी, उपद्व्याप (हिंदी)
९. माळी
११. ठेकेदार
१३. अक्कलहुशारीने वागणारा
१५. सिंहाचे भारतातील अभयारण्य येथे आहे
१७. धमकी, घातलेली भीती
१८. मलई
२२. हवेतील थंडावा
२३. औदार्य, देण्याची वृत्ती
२५. कमळ
२६. रममाण, गुंग
२७. बेसावध
२८. अभयदान
३०. भांडणे लावणे
३२. घाई, त्वरा
३३. शंकर
३४. धाक, भीती
३५. आवरण
३६. रोखलेली नजर
३९. तारणारा
४४. अंत:करण
४७. संताप
४९. नवीन आलेला
५१. मऊ
५२. विविध
५३. शिर्डीचे संत
५४. वचन, मुदतविषयीचा करार
५६. दीर्घ श्वास
५८. कायदेशीर
५९. जास्तीत जास्त
६०. गट, लोकांचा समूह
६२. फणा काढणारा सर्प
६३. रहस्य
६४. सोडलेला श्वास
६६. उबदार पांघरुण (इंग्रजी)
६७. दृष्टीभेट
७२. बाणेदार
७४. लाटण्याचा साथीदार
७५. न्याय, प्रशंसा
७७. ढग (संस्कृत)
७८. आई
८०. अंतर, तफावत
८२. सोन्या-चांदीचा व्यापारी
८४. बैलाचा सण
८७. आवाजातील घोगरेपणा

### आडवे उत्तर

१.अंबारी ३.गरजवंत ७.सणक १०.जल ११.मुद्दाम १२.दरडोई १४.रवानगी १६.नकलाकार १७.धनी १८.सातू १९.कर २०.समय २१.बागायतदार २४.अजरामर २७.गाजर २९.तलाव ३१.वाताहत ३४.वटवट ३७.वाणी ३८.लता ४०.तट्ट ४१.सन ४२.चर ४३.कमला ४५.जू ४६.रबडी ४८.कफन ५०.नवीन ५२.नाक ५३.सागवान ५५.लवाद ५७.रसना ५९.कढई ६१.गमनागमन ६४.उमा ६५.बारदान ६८.मुदत ६९.गम ७०.दरसाल ७१.बाग ७३.कळशी ७५.दारा ७६.यजमानीण ७९.रफ ८१.बाग ८२.सदन ८३.लता ८४.पोट ८५.रट्टा ८६.पाखरा ८८.कंद ८९.वेगळा ९०.पोक ९१.सटरफटर

### उभे उत्तर

१.अंजन २.बालक ३.गद्दार ४.रम ५.वंदनीय ६.तर ७.सई ८.करतूत ९.बनकर ११.मुकादम १३.डोकेबाज १५.गीर १७.धमकावणी १८.साय २२.गारवा २३.दानत २५.राजीव २६.रत २७.गाफील २८.जीवनदान ३०.लावालावी ३२.तातडी ३३.हट्ट ३४.वचक ३५.टरफल ३६.टक ३९.तारक ४४.मन ४७.रग ४९.नवागत ५१.नरम ५२.नाना ५३.साईबाबा ५४.वायदा ५६.दम ५८.समदशीर ५९.कमाल ६०.समुदाय ६२.नाग ६३.गमक ६४.उसासा ६६.रग ६७.नजरानजर ७२.मानी ७४.पोळपाट ७५.दाद ७७.जलद ७८.माता ८०.फरक ८२.सराफ ८४.पोळा ८७.खर



# क्रीडा विश्व





स्पेनमधील व्हॅलेन्सिया येथे ला लीगा फुटबॉल सामन्यात भाग घेताना रिअल माद्रिद आणि लेव्हान्टे यूडीचे खेळाडू.

## एशियाकपमध्ये पाकिस्तानचा संघ अंतिम फेरीच्या शर्यतीत कायम

अबुधाबी : आशिया कप २०२५ च्या सुपर ४ सामन्यात पाकिस्तानने श्रीलंकेला ५ विकेट्सने पराभूत करत अंतिम फेरीत पोहोचण्याच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना १३३ धावा केल्या आणि पाकिस्तानने १२ चेंडू शिल्लक असताना हे आव्हान सहज पार केले. श्रीलंकेच्या १३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने साहिबजादा फरहान आणि फखर जमान यांनी ४५ धावांची सलामी भागिदारी केली. पण महिश थीकशनाने दोन्ही सलामीवीरांना सलग बाद करून श्रीलंकेला पुन्हा सामन्यात आणले. सॅम अयुब आणि सलमान आगा यांनाही लागोपाठ बाद करण्यात आले. पाकिस्तानने १२ धावांत चार विकेट्स गमावल्या होत्या. या कठीण परिस्थितीत मोहम्मद हरिसने १३ धावांची महत्त्वाची खेळी केली. त्यानंतर हुसेन तलत आणि मोहम्मद नवाज यांनी जबाबदारी स्वीकारली आणि पाकिस्तानला विजय मिळवून देण्यासाठी नाबाद ५८ धावांची भागीदारी केली. दोन्ही फलंदाज प्रत्येकी ३२ धावांवर नाबाद राहिले.



श्रीलंकेकडून वानिंदू हसरंगा आणि महेश थीकशनाने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.
श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. डावाच्या दुसऱ्या चेंडूवर कुसल मेंडिस एकही धाव न काढता बाद झाला.त्यानंतर पथुम निस्सांका ८ धावा काढून बाद झाला. श्रीलंकेकडून कामिंदू मेंडिसने ५० धावांची झुंजार खेळी केली. कर्णधार चरिथ असलंकाने २० धावा, चमिका करुणारत्नेने १७ धावा आणि कुसल पेरेला आणि वानिंदू हसरंगा यांनी प्रत्येकी १५ धावा केल्या. शाहीन शाह आफ्रिदीने पाकिस्तानकडून सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. हरिस रौफ आणि हुसेन तलत यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या, तर अबरार अहमदनेही एक विकेट घेतली.
या विजयामुळे पाकिस्तानची अंतिम फेरीत पोहोचण्याची शक्यता जिवंत आहे. दरम्यान, सुपर ४ टप्प्यात श्रीलंकेला सलग दुसऱ्या पराभवाचा सामना करावा लागला आणि अंतिम फेरीत पोहोचण्याच्या त्यांच्या आशा संपुष्टात आल्या आहेत. क्रिकेट चाहते आता भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तिसऱ्या सामन्याची वाट पाहत आहेत, जी फक्त तेव्हाच शक्य होणार आहे. जेव्हा भारतीय संघ अंतिम फेरीत प्रवेश करेल आणि पाकिस्तान बांगलादेशला पराभूत करण्यात यशस्वी होईल.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### वर्ल्डकपआधी भारतीय संघाला मोठा धक्का! स्टार खेळाडू गंभीर दुखापतग्रस्त

दिल्ली-येत्या ३० सप्टेंबरपासून भारतात आयसीसी महिला वर्ल्डकप २०२५ स्पर्धेचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेला सुरूवात होण्याआधी सराव सामन्यांना सुरूवात झाली आहे. दरम्यान भारती संघाला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडविरूद्धच्या सराव सामन्यादरम्यान भारताची स्टार खेळाडू अरूंधती रेड्डी दुखापतग्रस्त झाली आहे. दुखापत इतकी गंभीर होती की,तिला व्हिलचेअरच्या साहाय्याने मैदानाबाहेर घेऊन जाण्यात आलं. अरूंधती रेड्डी ही भारतीय संघातील स्टार गोलंदाज आहे. वर्ल्डकप स्पर्धेला सुरूवात होण्याआधी अरूंधती रेड्डी दुखापतग्रस्त होणं हा भारतीय संघासाठी सर्वात मोठा धक्का आहे.
भारतीय संघाचा पहिला सामना ३० सप्टेंबरला श्रीलंकेविरूद्ध होणार आहे. या सामन्याआधी भारतीय संघाचा सराव सामना ८ इंग्लंडविरूद्ध पार पडला. तर झाले असे की,इंग्लंडची फलंदाजी सुरू असताना अरूंधती रेड्डी गोलंदाजी करत होती. अरूंधती रेड्डीने टाकलेल्या चेंडूवर इंग्लंडच्या फलंदाजाने समोरच्या दिशेने फटका मारला. अरूंधती रेड्डीने झेल घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तिचा तोल गेला. तिला इतक्या वेदना होत होत्या की, ती स्वत:च्या पायावर देखील उभी राहु शकत नव्हती. तर १२ ऑक्टोबरला भारतीय संघाचा सामना ऑस्ट्रेलियाविरूद्ध होणार आहे.

***

### गंभीरने ज्याच्यावर विश्वास दाखवला, त्याने निवड होताच मैदान गाजवले, कोण आहे टीम इंडियाचा छुपारुस्तम?

मुंबई-वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी टीम इंडियाच्या १५ सदस्यांची घोषणा करण्यात आली आहे. या संघात अनेक खेळाडूंना संधी मिळालेली आहे, तर काहींना डच्चू मिळाला आहे. इंग्लंड विरूद्ध टेस्ट मालिकेत उत्कृष्ट खेळी करणाऱ्या एका खेळाडूला या दौऱ्यासाठी संधी मिळाली आहे. विशेष म्हणजे ही संधी मिळताच क्षणी त्याने टेस्ट सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली आहे.त्यामुळे या कामगिरीच्या बळावर खेळाडूने गंभीरने दाखवलेला विश्वास सार्थ करून दाखवला आहे.त्यामुळे हा खेळाडू कोण आहे? हे जाणून घेऊयात.हा खेळाडू दुसरा तिसरा कुणी नसून टीम इंडियाचा स्टार ऑलराऊंडर वॉशिंग्टन सुंदर आहे. वॉशिंग्टन सुंदर यांची वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी जाहीर झालेल्या १५ सदस्यीय संघात निवड झाली आहे. ही निवड होताच त्याने मैदान गाजवलं.सध्या टीम इंडिया आशिया कप खेळते आहे. पण टीम इंडियाचा हा खेळाडू वॉशिंग्टन सुंदर सध्या काऊंटी क्रिकेट खेळत आहे. या स्पर्धेत खेळताना त्याने मैदान गाजवलं आहे.भारताचा वॉशिंग्टन सुंदर हा काऊंटी चॅम्पियन्सशिपमध्ये हॅम्पशायर संघाचा भाग आहे. सरे विरूद्ध खेळताना सूरूवातीला गोलंदाजी करताना वॉशिंग्टन सुंदरने तीन महत्वपुर्ण विकेट घेतल्या होत्या. तर फलंदाजी करताना त्याने

***

### टीम इंडियाला एके४७ दाखवणाऱ्या खेळाडूची भर मैदानात अब्रु गेली

दिल्ली-पाकिस्तानच्या साहिबजादा फरहानने भारताविरूद्ध अर्धशतक ठोकून एके ४७ सेलिब्रेशन केले होते. त्याच्या या सेलिब्रेशननंतर मोठा वाद पेटला होता. पण आज बांग्लादेशविरूद्ध खेळताना त्यांची लाज गेली आहे. कारण अवघ्या ४ धावांवर बाद झाला आहे. त्यामुळे टीम इंडियाचा एके ४७ दाखवणाऱ्या साहिबजादा फरहानची भर मैदानात अब्रू गेली आहे.विशेष म्हणजे त्याच्या पाठोपाठ सॅम अय्युब शुन्यावर बाद झाला आहे.त्यामुळे पाकिस्तानची अवस्था बिकट झाली आहे.खरे तर टीम इंडिया आशिया कपच्या फायनलमध्ये पोहोचली आहे. त्यानंतर फायनल मध्ये पोहोचणाऱ्या दुसऱ्या टीमचा निकाल आज लागणार आहेत. पाकिस्तान आणि बांग्लादेश यांच्यातून जिंकणारा संघ भारताची फायनलमध्ये भिडणार आहेत. त्यामुळे त्या दृष्टीने हा महत्वाचा सामना आहे. या महत्वाच्या सामन्यातच पाकिस्तानची हालत खराब झाली आहे.
त्याचे झाले असे की पाकिस्तानकडून फखर जमान आणि साहिबजादा फरहान सलामीला उतरले होते.अशातच आता दुसरीकडे पाकिस्ताने देखील बीसीसीआयच्या कारवाईला उत्तर देण्याचा केविलवाणा प्रयत्न केलाय.

***

### टीम इंडियाचा प्लान बॅकफायर झाला, सूर्या-गंभीर चूक सुधारणार

दुबई-टीम इंडियाचा ओपनर अभिषेक शर्मा (७५ रन) ने ठोकलेले लागोपाठ दुसरे अर्धशतक आणि स्पिनर कुलदीप यादवच्या ३ विकेट तसंच वरुण चक्रवर्तीच्या २ विकेटमुळे भारताने आशिया कपच्या सुपर-४ सामन्यात बांगलादेशचा ४१ रननी पराभव केला. या विजयासोबतच टीम इंडिया फायनलमध्ये पोहोचली आहे.
अभिषेक शर्माने ३७ बॉलमध्ये ७५ रनची आक्रमक खेळी केली, ज्यात ६ फोर आणि ५ सिक्सचा समावेश होता. अभिषेक शर्माच्या या खेळीनंतरही टीम इंडियाला २० ओव्हरमध्ये ६ विकेट गमावून फक्त १६८ रनच करता आल्या. दुसरीकडे बांगलादेशकडूनही फक्त ओपनर सैफ हसन हाच एक बाजू लढवत होता. सैफ हसनने ५१ बॉलमध्ये ५ सिक्स आणि ३ फोरच्या मदतीने ६९ रन केल्या. बांगलादेशची टीम १९.३ ओव्हरमध्ये १२७ रनवर ऑलआऊट झाली. या सामन्यातही भारतीय टीमने कॅच सोडले.लिटन दासच्या गैरहजेरीत झाकिर अलीने भारताविरुद्ध बांगलादेशचं नेतृत्व केलं. या सामन्यात बांगलादेशने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला. या सामन्यात टीम इंडियाने त्यांच्या बॅटिंग लाईनअपमध्ये बदल केले, पण त्यांचा हा प्लान अपयशी ठरला, त्यामुळे चांगल्या सुरूवातीनंतरही टीम इंडियाला १७० रनचा आकडा गाठता आला नाही.

## ४१ वर्षानंतर पहिल्यांदाच भारत वि. पाक संघ फायनलमध्ये भिडणार!



**दुबई:**आशिया चषक २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये रंगणार आहे.
आशिया चषक २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश करणारे २ संघ ठरले आहेत. बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या सामन्यात पाकिस्तानने विजय मिळवत आशिया चषक २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. याआधी बुधवारी झालेल्या सामन्यात भारतीय संघाने बांगलादेशवर एकतर्फी विजयाची नोंद करत अंतिम स्थान मिळवलं होतं. दरम्यान ४१ वर्षांनंतर भारत- पाकिस्तान दोन्ही संघ पहिल्यांदाच आशिया चषकातील अंतिम फेरीत आमनेसामने येणार आहेत. दरम्यान केव्हा, कधी आणि कुठे होणार हा सामना? जाणून घ्या.
भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत हाय व्हॉल्टेज सामने पाहायला मिळाले आहेत. पण हे दोन्ही संघ आतापर्यंत आशिया चषकातील अंतिम फेरीत आमनेसामने आले नव्हते. आता १७ हंगाम आणि ४१ वर्षांनंतर पहिल्यांदाच दोन्ही संघ अंतिम फेरीत भिडणार आहेत. त्यामुळे दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळू शकते. आशिया चषक २०२५ स्पर्धेत दोन्ही संघ २ वेळेस आमनेसामने आले होते. या दोन्ही सामन्यांमध्ये भारताने पाकिस्तानचा एकतर्फी धुव्वा उडवला होता.भारत- पाकिस्तान सामन्याबाबत संपूर्ण माहिती
भारत- पाकिस्तान यांच्यात होणारा अंतिम सामना येत्या रविवारी २८ सप्टेंबरला होणार आहे.भारत- पाकिस्तान यांच्यात होणारा अंतिम सामना किती वाजता सुरू होईल?
भारत- पाकिस्तान यांच्यात होणारा अंतिम सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होईल. तर नाणेफेक ७:३० वाजता होईल.भारत- पाकिस्तान सामना लाईव्ह कुठे पाहता येणार?भारत- पाकिस्तान यांच्यात होणारा सामना सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर लाईव्ह पाहता येणार आहे.
यासह तुम्ही या सामना सोनी लिव्ह ॲपवर देखील लाईव्ह पाहू शकता.बांगलादेशवर विजय मिळवून पाकिस्तानची अंतिम फेरीत धडकबांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यात झालेला सामना हा सेमीफायनलपेक्षा कमी नव्हता. कारण विजय मिळवणाऱ्या संघाला थेट अंतिम फेरी गाठण्याची संधी होती. या सामन्यातील पहिल्या डावात बांगलादेशच्या गोलंदाजांनी दमदार गोलंदाजी करून पाकिस्तानला १३५ धावांवर रोखलं. बांगलादेशला हा सामना जिंकण्यासाठी १३६ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना बांगलादेशला २० षटकांअखेर ९ गडी बाद १२४ धावा करता आल्या.

## ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या वन-डेत स्लो ओव्हर रेटसाठी भारतीय महिला संघाला दंड

दुबई : अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या आणि निर्णायक एकदिवसीय सामन्यात स्लो ओव्हर रेट राखल्याबद्दल भारताला मॅच फीच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. बेथ मुनी आणि स्मृती मानधना यांनी शतके झळकावलेल्या



रोमांचक सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा ४३ धावांनी पराभव केला.आयसीसीच्या मते एमिरेट्स आयसीसी इंटरनॅशनल पॅनेल ऑफ मॅच रेफ्रीजच्या जीएस लक्ष्मी यांनी ही शिक्षा लागू केली. आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.२२ नुसार, निर्धारित वेळेत न टाकलेल्या प्रत्येक षटकासाठी संघाला त्याच्या मॅच फीच्या पाच टक्के दंड ठोठावला जातो. भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या आगामी आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकापूर्वी दोन्ही संघांमधील हा शेवटचा सामना होता. भारतीय संघ ३० सप्टेंबर रोजी गुवाहाटीमध्ये श्रीलंकेविरुद्ध आपला विश्वचषकाचा प्रवास सुरू करणार आहे. तर ऑस्ट्रेलिया दुसऱ्या दिवशी इंदूरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध पहिला सामना खेळेल.
ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय महिला संघाला पराभव पत्करावा लागला तरी, मानधनाने केवळ ५० चेंडूत एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय महिला क्रिकेटपटूकडून सर्वात जलद शतक झळकावले. भारतीय फलंदाज विराट कोहलीने यापूर्वी २०१३ मध्ये जयपूर येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५२ चेंडूत भारताकडून सर्वात जलद एकदिवसीय शतक ठोकले होते.

## ऊर्जा कालेकरची सुवर्ण हॅट्रिक



पुणे : नेमबाज ऊर्जा कालेकर हिने गोव्यात पार पडलेल्या १२ व्या वेस्ट झोन नेमबाजी स्पर्धेत तब्बल तीन सुवर्णपदके जिंकत चमकदार कामगिरी केली. १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात तिने ४०० पैकी ३७० गुणांची कमाई करत युवा, कनिष्ठ व वरिष्ठ गटात सुवर्णपदक पटकावले. एकूण ९०० स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यामध्ये ऊर्जा हिने मिळवलेले हे यश कौतुकास्पद ठरले आहे. गुरुकुल शूटिंग अकॅडमी, सर परशूरामभाऊ महाविद्यालय, सदाशिव पेठ येथे ती नेमबाजीचा सराव करते. तिच्या या यशामागे प्रशिक्षक गौरव झेंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन आहे. ऊर्जा हिच्या या सुवर्ण कामगिरीमुळे आगामी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये तिच्याकडून आणखी मोठ्या यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सूर्यकुमार यादव पाकिस्तानच्या तक्रारीनंतर सुनावणीला हजर

मुंबई-भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवच्या विरोधात पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने तक्रार दाखल केली होती. तर आयसीसीने देखील पाकिस्तानी बोर्डाची ही तक्रार स्वीकारली होती. यामुळे सूर्याला आयसीसीच्या सुनावणीसाठी हजर राहावं लागलं होतं. याबाबतची मोठी अपडेट आता समोर आली आहे. आशिया चषक २०२५ च्या साखळी सामन्यात पाकिस्तानवर सात विकेट्सनी विजयानंतर सूर्यकुमार यादवच्या वक्तव्याबाबत पीसीबीने आयसीसीकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर आयसीसीने हे प्रकरण चौकशीसाठी मॅच रेफरी रिची रिचर्डसन यांच्याकडे पाठवले. रिची रिचर्डसन यांनी या प्रकरणाची सुनावणी केली. या सुनावणीत भारतीय टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव याच्यासह बीसीसीआयचे सीईओ हेमांग अमीन आणि क्रिकेट ऑपरेशन्स मॅनेजर सुमित मल्लापूरकर होते. या सुनावणीदरम्यान, सूर्यकुमार यादवला अधिकृतपणे इशारा देण्यात आला आणि त्यानंतर भारतीय कर्णधाराला दंड होऊ शकतो किंवा त्याच्यावर डिमेरिट पॉइंट्स दिले जाऊ शकतात.अशा प्रकरणांमध्ये, एकतर इशारा दिला जातो, सामना शुल्कातून १५म कपात केली जाते किंवा एक डिमेरिट पॉइंट दिला जातो. त्यामुळे सूर्यकुमारवर सामना खेळण्याची बंदी घातली जाणार नाही. या प्रकरणाचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे, परंतु असं मानलं जात आहे की सूर्याला इशारा देऊन सोडले जाऊ शकते. या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी होणार आहे.



फिलीपिन्समधील पासे येथे सुरू असलेल्या एफआयव्हीबी पुरुषांच्या जागतिक स्पर्धेत भाग घेताना इटली आणि बेल्जियमचे खेळाडू.

## अश्विन आता पाकिस्तानी प्लेअरसोबत खेळणार?

मुंबई-आर. अश्विन हा ऑस्ट्रेलियाच्या बिग बॅश लीगमध्ये (बीबीएल) सिडनी थंडर्सकडून खेळणार आहे. बीबीएलमध्ये खेळणारा अश्विन भारताचा पहिलाच आंतरराष्ट्रीय पुरुष खेळाडू आहे. याआधी महिला बीबीएलमध्ये अनेक भारतीय महिला खेळाडू खेळल्या आहेत, पण बीसीसीआयच्या नियमांमुळे भारतीय पुरुष खेळाडूंना बीबीएलमध्ये सहभागी होण्यासाठी बंदी होती. याआधी भारताच्या अंडर-१९ टीमचा कर्णधार उन्मुक्त चंद आणि भारताचा स्थानिक खेळाडू निखील चौधरी बीबीएलमध्ये खेळले होते, पण चंद हा अमेरिकेचा नागरिक आहे, तर निखील हा ऑस्ट्रेलियामध्ये स्थानिक खेळाडू म्हणून पात्र झाला आहे.
अश्विनने टीम इंडियाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली, तर काहीच दिवसांपूर्वी त्याने आयपीएलमधूनही निवृत्तीची घोषणा केली. भारतीय क्रिकेटमधून निवृत्त झाल्यामुळे अश्विनला परदेशातल्या लीगमध्ये खेळणं शक्य झालं आहे. बीबीएलशिवाय



अश्विन आयएलटी२० मध्येही खेळणार आहे. आयएलटी२० चा लिलाव पुढच्या आठवड्यात होणार आहे, यासाठी अश्विनची बेस प्राईज सर्वोच्च आहे.
आयएलटी२० मध्ये अश्विन २ डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान खेळेल, त्यामुळे तो बीबीएलच्या पहिल्या ३ आठवड्यांसाठी उपलब्ध नसेल. बीबीएलची लीग स्टेज १८ जानेवारीपर्यंत तर अंतिम सामने २० ते २५ जानेवारी दरम्यान होणार आहेत.इंग्लंडला वर्ल्ड कप जिंकवून देणारे माजी प्रशिक्षक ट्रेवर बेलिस हे आता सिडनी थंडरचे प्रशिक्षक आहेत. तसंच डेव्हिड वॉर्नर हा सिडनीचा कर्णधार आहे. मागच्या बीबीएल फायनलमध्ये सिडनीला होबार्ट हरिकेन्सकडून पराभव पत्करावा लागला होता. ऑस्ट्रेलियाचा टेस्ट ओपनर सॅम कॉन्स्टास हादेखील सिडनी थंडरचा खेळाडू आहे. ऑस्ट्रेलियाचा टेस्ट टीमचा कर्णधार पॅट कमिन्स करारबद्ध नसतानाही सिडनी थंडरसोबत संलग्न आहे. कमिन्स हा टेस्ट क्रिकेटमुळे २०१९ पासून सिडनी थंडरसाठी खेळलेला नाही.
अश्विन कधी खेळणार?
सिडनी थंडरचे या मोसमातील शेवटचे चार सामने ६,१०,१२ आणि १६ जानेवारीला आहेत. यापैकी ३ सामन्यांना अश्विन उपलब्ध असेल. आयएलटी२० मध्ये अश्विनची टीम आधीच बाहेर झाली तर मात्र अश्विन सिडनीकडून जास्त मॅच खेळू शकेल.
अश्विन पाकिस्तानी खेळाडूसोबत
आर. अश्विन हा बीबीएलमध्ये पाकिस्तानी खेळाडूसोबत ड्रेसिंग रूम शेअर करेल. शादाब खान हादेखील सिडनी थंडर्सच्या टीममध्ये आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने मुसळधार पाऊस आणि पूरसदृश परिस्थितीत प्रवाशांची सुरक्षा आणि मदत सुनिश्चित केली







**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने अत्यंत समर्पणाने हे आव्हान पेलले आहे, अतिव्रुष्टी आणि त्यानंतर आलेल्या पूरसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना सुरक्षितता आणि वेळेवर मदत सुनिश्चित केली आहे.

भीमा नदीची उपनदी असलेली सीना नदी ओसंडून वाहत असल्याने कुर्डुवाडी–लातूर आणि कुर्डुवाडी–सोलापूर विभागांमध्ये रेल्वे वाहतुकीचे नियमन आवश्यक होते. परिस्थिती हाताळण्यासाठी, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) सोलापूर, डॉ. सुजीत मिश्रा यांनी वरिष्ठ विभागीय अधिकाऱ्यांसह वैयक्तिकरित्या घटनास्थळी तपासणी केली आणि प्रवाशांचे संरक्षण करण्यासाठी आणि व्यत्यय कमी करण्यासाठी बारकाईने लक्ष ठेवले.

प्रवासी–केंद्रित व्यापक उपाययोजना:

– गंतव्यस्थानांनुसार कुर्डुवाडी–मिरज आणि कुर्डुवाडी–लातूर मार्गांवरून रेल्वे वाहतूक सक्रियपणे वळवण्यात आली. सोलापूरला जाणाऱ्या गाड्या कमी वेळात थांबवण्यात आल्या.
– राज्य परिवहन मंडळाशी समन्वय साधून, प्रवाशांना पुढील प्रवास सुलभ करण्यासाठी कुर्डुवाडी आणि माढा येथे बसेसची व्यवस्था करण्यात आली.
– प्रवाशांना मदत आणि मार्गदर्शन करण्यासाठी सोलापूर, लातूर, धाराशिव, कुर्डुवाडी, मोहोळ, पंढरपूर आणि माढा स्थानकांवर मदत कक्ष सुरू करण्यात आले.
– तिकीट तपासणी कर्मचारी स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये चोवीस तास, सौजन्याने आणि काळजीने मदत करत होते.
– अडकलेल्या प्रवाशांना केळी आणि पाण्याच्या बाटल्यांसह केटरिंग सेवा पुरवण्यात आल्या, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि मुलांवर विशेष लक्ष देण्यात आले.
– आवश्यकतेनुसार वैद्यकीय मदतीची त्वरित व्यवस्था करण्यात आली.
– अधिकृत सोलापूर विभाग ट्विटर (एक्स) हँडल आणि प्रवासी संघटनांच्या स्थानिक व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे नियमित अपडेट्स शेअर केले जात होते.
– प्रवाशांना मोठ्या प्रमाणात एसएमएस संदेश पाठवण्यात आले.
– रिअल–टाइम अपडेट्ससाठी स्थानकांवर सार्वजनिक घोषणा करण्यात आल्या.
– वेळेवर परतफेड करण्यासाठी पुरेशी रोकड उपलब्ध केली होती.
– प्रमुख स्थानकांवर अतिरिक्त तिकीट तपासणी कर्मचारी आणि सीसीआय तैनात करणे.

डीआरएम, सीनियर डीईएन (सेंट्रल) आणि सीनियर डीएसओ यांनी परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले आणि नियंत्रण कार्यालयाचे कामकाज सीनियर डीओएम आणि सीनियर डीसीएम यांनी पाहिले, ज्यामुळे सुरळीत समन्वय साधला गेला.


रात्रभर आणि दुसऱ्या दिवशी, सोलापूर विभागातील समर्पित कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना सहानुभूती, सौजन्य आणि कार्यक्षमतेने मदत करण्यासाठी अथक परिश्रम केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे गाड्यांची सुरक्षित वाहतूक सुनिश्चित झाली, प्रवाशांची गैरसोय कमी झाली आणि या आव्हानात्मक काळात रेल्वेची सार्वजनिक सेवेसाठीची वचनबद्धता कायम राहिली.

## भारतीय रेल्वेने आयआरसीटीसी संकेतस्थळ आणि मोबाईल अ‍ॅपवरून ऑनलाइन तिकिट आरक्षणासाठी बुकिंगच्या पहिल्या १५ मिनिटांत आधार अधिप्रमाणन अनिवार्य

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय रेल्वेने आयआरसीटीसी संकेतस्थळ आणि मोबाईल अ‍ॅपवरून ऑनलाइन तिकिट आरक्षणासाठी बुकिंगच्या पहिल्या १५ मिनिटांत आधार अधिप्रमाणन अनिवार्य केले आहे भारतीय रेल्वेने इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी) संकेतस्थळ व मोबाईल अ‍ॅपद्वारे ऑनलाइन तिकिट आरक्षणासाठी बुकिंग सुरू झाल्यानंतरच्या पहिल्या १५ मिनिटांत आधार अधिप्रमाणन अनिवार्य केले आहे. हे आधार अधिप्रमाणन केवळ सामान्य आरक्षण उघडण्याच्या पहिल्या १५ मिनिटांपुरतेच लागू असेल. सुरुवातीच्या दिवशी आरक्षित तिकिटे बुक करण्यासाठी सामान्य आरक्षित तिकिटे उघडण्याच्या १० मिनिटांच्या मर्यादेच्या वेळेत कोणताही बदल होणार नाही, ज्या दरम्यान भारतीय रेल्वेच्या अधिकृत तिकीट एजंटना सुरुवातीच्या दिवशीची आरक्षित तिकिटे बुक करण्याची परवानगी दिली जाणार नाही. संगणकीकृत पीआरएस काउंटरद्वारे सामान्य तिकिटांच्या बुकिंगमध्ये देखील कोणताही बदल होणार नाही. हा नियम १.१०.२०२५ पासून लागू होईल. ऑनलाइन तिकिट प्रणालीचा गैरवापर टाळण्यासाठी आणि या प्रणालीचे लाभ सामान्य प्रवाशांपर्यंत पोहोचावेत यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मध्य रेल्वे प्रवाशांना विनंती करते की ते तिकिट नियमांतील बदल लक्षात घेतील आणि त्यानुसार आपली तिकिट बुकिंगची योजना आखतील.

## बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकला ठार; वन्यप्राण्याचा बंदोबस्त करण्याची मागणी करत ग्रामस्थांचा रास्ता रोको

गोंदिया : जिल्ह्यातील वन्यप्राणी आणि मानवी संघर्षात आज चिमुकल्याचा बळी गेला आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गोठणगाव इटियाडोह धरण जवळील असलेल्या ग्राम संजयनगर ( बंगाली कॅम्प) येथे बिबट्यानं चिमुकल्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अंश प्रकाश मंडल (वय ५ वर्षे) हा चिमुकला ठार झाला. अंश मंडल हा चिमुकला आजी अर्चना मंडल यांच्यासोबत २५ सप्टेंबरच्या पहाटे ५ वाजण्याच्या सुमाराला लघुशंकेकरिता घराच्या बाहेर अंगणामध्ये आला. यावेळी दबा धरून बसलेल्या बिबट्यानं त्या ५ वर्षे चिमुकल्यावर हल्ला केला. बिबट्यानं चिमुकल्याच्या मानेला पकडून फरकटत नेलं. चिमुकल्याच्या आजीनं आरडाओरडा केला. तेव्हा परिसरातील लोकांनी धाव घेतली. आवाजाच्या दिशेनं लोकांनी धाव घेतली असता बिबट्यानं चिमुकल्याला सोडून धूम ठोकली. केशोरी– नवेगाव मार्ग पूर्णपणे बंद करून रास्ता रोको– जखमी मुलाला प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी येथे नेले. मात्र, त्या चिमुकल्याला मृत्यू झाला असल्याचं वैद्यकीय अधिकारी डॉक्टर पिंकू मंडल यांनी सांगितलं. घटनेची माहिती वन विभागाला आणि पोलीस विभागाला प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरीकडून देण्यात आली आहे. ५ वर्षे चिमुकल्याला बिबट्यानं मारल्याची घटना समजताच नागरिक संतप्त झालेत. सकाळी सात वाजल्यापासून संजय नगर येथील सर्व महिला–पुरुष एकत्र आले. वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, या मागणीकरिता ग्रामस्थांनी मुख्य रस्ता केशोरी– नवेगाव मार्ग पूर्णपणे बंद करून रास्ता रोको आंदोलन केलं.



बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी–पीडित मुलाचे वडील एक दिवसापूर्वीच कामासाठी गुजरात येथे गेले होते. तर मुलाची आई आपल्या माहेरी गेलेली होती. हल्ला केलेल्या बिबट्याला लवकरात लवकर पकडावे, अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे. २९ ऑगस्ट २०२५ ला इटियाडो धरण येथे फिरायला कुटुंबातील ४ वर्षीय मुलावर बिबट्यानं हल्ला केला होता. २०२४ मध्ये गोठणगाव येथे मंडई उत्सव सुरू असतानाच सायंकाळी साडेपाच वाजता अंगणात असलेल्या लहान मुलावरसुद्धा हल्ला केल्याची घटना घडली होती. संजयनगर, बोंडगाव येथे खूप वेळा बिबट्या दिसल्यानं ग्रामस्थांनी अनेकदा जोरजोरात आवाज देऊन बिबट्याला परत लावलं आहे. बिबट्यांच्या बंदोबस्त करावा, असे वन विभागाला कित्येक वेळा परिसरातील ग्रामस्थांनी सांगितलं आहे. असे असतानासुद्धा वन विभागानं याकडे दुर्लक्ष दिल्यानं ग्रामस्थांचा वन विभागाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात रोष दिसून येत आहे.

# जळकोट तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची सहकार मंत्र्यांकडून पाहणी

**जळकोट प्रतिनिधी :** राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हें गुरुवारी जळकोट तालुक्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी तालुक्यातील चेरा येथील उत्तमराव माने यांनी नापीकी मुळे आत्महत्या केली होती. माने कुटुंबाची भेट घेत त्यांचे सांत्वन केले व कुटुंबीयांना धीर दिला. या संदर्भात जळकोटचे तहसीलदार यांना मदतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील दिले.

त्यानंतर त्यांनी तालुक्यातील पाटोदा खुर्द येथेही नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांची भेट घेतली.

माळहिप्परगा येथे शान सूर्यवंशी, वैभव गायकवाड हे अतिवृष्टीमुळे झालेल्या पुरात वाहून गेल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यांच्याही कुटुंबाची भेट घेऊन कुटुंबाचे सांत्वन केले.

सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी तिरूका येथे तिरु नदीची पाहणी केली व त्यामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानी ची पाहणी करून शेतकरी यांना धीर दिला.

तसेच येथील सुदर्शन माधव घोणशेट्टे शेताकडे जात असताना पुरात वाहून गेल्यामुळे त्यांच्या कुटुंबाची सांत्वनपर भेट घेऊन कुटुंबियांना धीर दिला

यावेळी सहकार मंत्र्यांसमवेत उपनगराध्यक्ष नगरपंचायत जळकोट मन्मथ किडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विठ्ठल



चव्हाण , संग्राम हासुळे पाटील, तहसीलदार जळकोट राजेश लांडगे, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, तालुका कृषी अधिकारी एस आर पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य चंदन पाटील, गजानन दळवे पाटील सह विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते...

## जया बच्चन यांनी मला काठीने मारलं..., प्रसिद्ध अभिनेत्याचा शॉकिंग खुलासा

मुंबई : बॉलिवूडच्या ज्येष्ठ अभिनेत्री जया बच्चन या नेहमीच चर्चेत असतात. त्यांच्या रागामुळे तर अनेकदा त्यांना ट्रोल व्हावं लागतं. नेहमीच कोणाला ओरडताना, रागावताना त्यांचे फोटो, व्हिडिओ व्हायरल होत असतात. त्यामुळे कामाशिवाय जया त्यांच्या रागामुळे अधिक प्रसिद्ध आहेत. नुकताच त्यांच्याविषयी आणखी एक शॉकिंग खुलासा समोर आलाय. एका अभिनेत्याने जया यांनी त्याला काठीने मारल्याचा खुलासा केला.

# दिव्यांगांना प्रशिक्षीत करून आत्मविश्वासाने जगण्याचे बळ देणारे संवेदना : माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर

### संवेदना दिव्यांग आयटीआयमध्ये कौशल्य दिक्षांत सोहळ्यात गुणवंत प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण

**लातूर/ प्रतिनिधी :** दिव्यांगांना प्रशिक्षीत करून आत्मविश्वासाने जगण्याचे बळ देणारे संवेदना प्रकल्प ही संस्था आहे. तसेच सक्षम मनुष्य बळ विकसित राष्ट्रांचा आधार असते तसेच या मनुष्यबळात दिव्यांगांचाही सहभाग नोंदवण्याचे काम महाराष्ट्रातील एकमेव दिव्यांगासाठीचे आयटीआय असणारे संवेदना प्रकल्प कार्य करते असा विश्वास लातूर भाजपा जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांनी व्यक्त केला.

लातूर तालुक्यातील हरंगुळ बु. येथे असलेल्या संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य दिक्षांत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यात शैक्षणिक वर्ष २०२४–२५ तील विविध कौशल्य विभागांत प्रशिक्षण घेतलेल्या गुणवंत प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर, अजित पाटील कव्हेकर, प्रेरणाताई होनराव , लातूर जिल्हा मा.संघचालक प्रा. राजेश्वर जी बेंबडे, वास्तुविशारद व शाळेचे कार्यवाह श्री. राहुल देशपांडे, श्री. रोहिदास वाघमारे, सुनील वसमतकर, अध्यक्ष संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था हरंगुळ बु. यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चे कार्यवाह श्री. प्रविण सगर यांनी केले.त्यांनी संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व संस्थेबद्दल माहिती दिली. त्यानंतर श्री. सुनील वसमतकर यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला. दीनदयालजी नी एकात्म मानव दर्शन विचार दिला. समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचला तरच तो समग्र विकास होऊ शकतो अशी धारणा दीनदयालजी उपाध्याय यांची होती. त्यानंतर एक वर्षीय कोर्स कोपा आणि ड्रेस मेकींगच्या गुणवंत प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

यानंतर मागील शैक्षणिक वर्षाचे प्रशिक्षणार्थी आदिनाथ सरगर, ऋतुजा कोळी, पालक संतोष सारंगे, ॲड. राजेश्वर देशमुख यांनी अतिशय भावनिक मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर श्रीमती प्रेरणा होनराव यांनी दिव्यांगाच्या अंधकारमय जीवनाला प्रकाशमय करण्याच कार्य संवेदना करते असे गौरवोद्गार काढले. श्री. अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले की पंतप्रधान मोदीच्या विकसित व स्वयंपूर्ण भारताच्या संकल्पनेत संवेदनातील विद्यार्थ्यांचे योगदान मोलाचं असणार आहे असं सांगितलं. यानंतर श्री. रोहीदास वाघमारे यांनी दिव्यांगांच्या कार्याचे विविध उपक्रम विषद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. व्यंकट लामजने यांनी केले. तर उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व पालकांचे आभार शाळेचे कार्यवाह श्री. राहुल देशपांडे यांनी मानले.




यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे समन्वयक विठ्ठलराव गाडेकर यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली, प्राचार्य आकाश मगर, मुख्याध्यापिका दिपाताई पाटील, निदेशक , सिध्दांत मंडाले, पुजा पाटील, शुभांगी रासुरे, रेणूका श्रीमंगले, मयुर दंडे यांच्यासह कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी नळेगाव येथील नुकसानग्रस्त भागाची केली पाहणी


**नळेगाव/प्रतिनिधी :** सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी आज चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. या पाहणीमध्ये त्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करून मदत करण्याचे निर्देश सहकार मंत्र्यानी प्रशासनास दिले. तसेच ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीत खरडून गेल्या आहेत अशा सर्व शेतकऱ्यांचे वेगळेपणाने पंचनामे करून त्याचा स्वतंत्र अहवाल शासनाकडे सादर करावा असे निर्देश ही राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी प्रशासनाला दिले. तसेच चाकूर तालुक्याला २९ कोटी रुपये अनुदान निधी प्राप्त झाला असून लवकरात लवकर निधी वितरण करण्याचे निर्देश सहकार मंत्र्यांनी प्रशासनाला दिले. तसेच २९ ऑगस्ट नंतर पडलेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे



पंचनामे करण्याचे निर्देश सुद्धा सहकार मंत्री ना. पाटील यांनी दिले आहे.

यावेळी सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या समवेत उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार नरसिंग जाधव, गटविकास अधिकारी संतोष वंगवाडे, सार्वजनिक बांधकाम विभागाची उपविभागीय अभियंता सुरज गौंड, जिल्हा परिषद बांधकाम चे विभागीय अभियंता सुभाष कुलकर्णी, नळेगावचे सरपंच कांतराव चव्हाण, सह विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जात वैधता प्रमाणपत्राची विशेष मोहीम

धाराशिव, (जिमाका) राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा (दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५) या उपक्रमांतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेत जिल्ह्यातील ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम २०२५-२६ मध्ये प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. याशिवाय सीईटी परीक्षा देणारे विद्यार्थी व डिप्लोमा तृतीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठीही ही मोहीम उपयुक्त ठरणार आहे.

विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर समान संधी केंद्रामार्फत वेबिनार आयोजित करण्यात येणार असून, यामार्फत विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करून त्यावर तत्काळ कार्यवाही करून जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येईल.

जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांनी आपल्या संबंधित महाविद्यालयामार्फत परिपूर्ण अर्ज सादर करून या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धाराशिव यांनी केले आहे.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांचे आविष्कार स्पर्धेत यश



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी गुंजोटी या ठिकाणी जिल्हास्तरीय अविष्कार स्पर्धे साठी महाविद्यालयाचे प्रभावी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी पाठवण्यात आले होते.

यापैकी शिवम पाटील या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक ,आनंदी पवार या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक ,आकाश वाघमारे व शिवम कोळी यांनी तृतीय क्रमांक तर विक्रांत कोळी आणि अमृत मगर यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले आहे.सदर विद्यार्थ्यांची निवड विद्यापीठ स्तरासाठी झालेली असून ते विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत. सदर स्पर्धेसाठी अविष्कार स्पर्धेचे समन्वयक डॉ.कुणाल वणंजे यांनी परिश्रम घेतले.स्पर्धे बद्दल सखोल माहिती सांगून विद्यार्थ्याकडून तयारी करून घेतली.त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या समवेत असणाऱ्या प्रा. डॉ. वैशाली बोबडे यांनी देखील या स्पर्धेसाठी योगदान दिले.

सदर स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि समन्वयक डॉ. कुणाल वणंजे आणि समवेत असणाऱ्या डॉ.वैशाली बोबडे यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे ,सचिवा प्राचार्य शुभांगी गावडे,मुख्यकार्यकारी अधिकारी श्री कौस्तुभ गावडे, मराठवाडा सह विभागप्रमुख डॉ. जयसिंगराव देशमुख, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे .

# जमियतुल-उलमा- हिंदची धाराशिव जिल्हा कार्यकारिणी जाहीर; जिल्हाप्रमुखपदी मौलाना अयुब सय्यद: मराठवाडा सचिवपदी मसूद शेख यांची फेरनिवड

धाराशिव(प्रतिनिधी)- जमियतुल-उलमा- हिंद या संघटनेची जिल्हा कार्यकारिणी जाहीर होवून जिल्हाप्रमुखपदी मौलाना सय्यद अयुब खासिम यांची निवड करण्यात आली. तर मराठवाडा सचिवपदी मसूद शेख यांची फेरनिवड करण्यात आली. उदगीर येथे जमियतुल-उलमा- हिंदचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मौलाना नदीम सिद्दीकी यांच्या अध्यक्षतेखाली उदगीर येथे झालेल्या संमेलनात ही निवड करण्यात आली.

जिल्हा कार्यकारिणीमध्ये काटगुजार अध्यक्षपदी मौलाना इम्रान पठाण, नायब अध्यक्षपदी मौलाना उस्मान खान, पैगंबर काझी, जनरल सेक्रेटरी आरेफ अहमद, सेक्रेटरी इलियास पीरजादे, मुफ्ती फिरदौस फेरोजखान तर सदस्यपदी जहिरोद्दीन काझी, आयाज शेख, उमरखाँ शेख, नईम पटेल, मौलाना शौकतअली सय्यद, अखिब पटेल, शब्बीर गवंडी, खलील पठाण, हाफीज युसुफ गुलाम मोहियोद्दीन, जावेद बागवान, अन्वर शेख, जावेद बागवान, हाफीज फेरोज काझी, नुरोद्दीन शेख यांची निवड करण्यात आली आहे.

याच संमेलनात ज मि य तु ल - उ ल म ा - हिंदची मराठवाडा कार्यकारिणी देखील जाहीर करण्यात आली. यामध्ये मराठवाडाप्रमुखपदी खारी शम्सुलहक खासमी, नायब प्रमुखपदी मौलाना अब्दुल जलील सय्यद, मुजतबा खान, जनरल सेक्रेटरीपदी मुफ्ती अब्दुर रहमान अशरफी, सेक्रेटरी म्हणून मौलाना मोईजोद्दीन फारूकी, मुफ्ती अब्दुर रज्जाक मिल्ली, मसूद शेख, मुफ्ती रहमतुल्ला, अब्दुर रौफ इंजिनिअर यांची निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल नूतन पदाधिकार्यांचा जमियतुल-उलेमा-हिंदच्या वतीने सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी सदिच्छा देण्यात आल्या.

# डीटीपीओ व्यवसायाचे प्रशिक्षणार्थी राज्यपातळीवर चमक



जळकोट (विजय पिसे)- भाई उद्धवराव पाटील शासकीय आयटीआय धाराशिव येथील डी. टी. पी. ओ या व्यवसायाची कु. प्रणाली सावंत हिने यावर्षीच्या अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा २०२५ मध्ये मुलींमधून महाराष्ट्रात द्वितीय तर याच व्यवसायाचा कु.प्रतीक गायकवाड हा महाराष्ट्रातून मुलांमधून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेला आहे. डी टी पी ओ अर्थातच डेस्क टॉप पब्लिशिंग ऑपरेटर हा एक वर्षाचा व्यवसाय भाई उद्धवराव पाटील शासकीय आयटीआय धाराशिव येथे गेली १५ वर्षापासून सुरू असून याही वर्षी या व्यवसायातील महाराष्ट्रातून पहिल्या तीनमध्ये येण्याची परंपरा कायम राखली आहे. या एक वर्षाच्या व्यवसायामध्ये फोटोशॉप, कोरल ड्रा, एम.एस ऑफिस, वेब पेज डिझाईनिंग, फ्लेक्स डिझाईनिंग,प्रिंटिंग, इन्व्हिटेशन कार्ड डिझाईनिंग व इत्यादी अनेक सॉफ्टवेअरचे ज्ञान ,कौशल्य या व्यवसायात शिकवले जाते.



या व्यवसायाचे तज्ञ शिल्प निदेशक श्री अतिश सुरवसे यांनी या दोन्ही उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले या घवघवीत यशाबद्दल या विभागातील प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक श्री पी .टी. देवतळे ,उपसंचालक श्री आर. बी. सावळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी श्री प्रवीण औताडे व संस्थेचे प्राचार्य श्री संतोष कांबळे यांनी अभिनंदन केले आहे.

# ठाकरेनगर नवरात्रोत्सव समितीच्या वतीने गरजू रुग्णांसाठी विशेष शिबिर
## महिलांसाठी खेळ पैठणीचा व धार्मिक कार्यक्रमाचेही आयोजन

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव शहरातील बाळासाहेब ठाकरेनगर येथील ठाकरेनगर नवरात्रोत्सव समितीच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त विविध आजारांवरील रुग्णांकरिता विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात अॅक्युप्रेशर, सुजोक उपचार, आणि नैसर्गिक उपचार पद्धतीचा सहा दिवसांचा कोर्स जोधपूर येथील अॅक्युप्रेशर, नॅचरोपॅथी रिसर्च ट्रिटमेन्ट या संस्थेमार्फत आयोजित करण्यात आला आहे. या शिबिरात तब्बल सातशे जणांनी नोंदणी करून सहभाग नोंदवला.

ठाकरेनगर नवरात्रोत्सव समितीचे मार्गदर्शक प्रशांत (बापू) साळुंके यांनी धाराशिवकरांसाठी पहिल्यांदाच ही उपचार पद्धती खास नवरात्र उत्सवाच्या काळात उपलब्ध करुन दिली आहे. या शिबिराचे उदघाटन नवरात्रोत्सव समिती मंडळ पदाधिकारी व सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नवरात्रोत्सव समितीच्या सर्व सदस्य तसेच ठाकरेनगर व परिसरातील भविक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ज्या व्यक्तींना चालणे कठीण आहे, ज्यांच्या गुडघ्याची गादी सरकली आहे, पायर्या चढणे कठीण झाले आहे अशा रूग्णांसाठी ही उपचार पद्धती फायदेशीर ठरणार असल्याचे जोधपूर येथील संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. बुधवार, दि. २४ सप्टेंबर ते मंगळवार ३० सप्टेंबर या कालावधीत सकाळी १० ते दुपारी १ आणि सायंकाळी ४ ते ७



या वेळेत हे शिबिर पार पडत आहे.

विशेषतः शिबिरामध्ये ब्लड प्रेशर, कंबरदुखी, हातपाय सुजणे, मधुमेह, सांधेदुखी, थायरॉईड, जुनी डोकेदुखी, लकवा, झोप न लागणे, अपचन व कंबरदुखीच्या रुग्णांनी तसेच मूळव्याधग्रस्तांसाठीही उपचार पद्धती उपलब्ध आहे. त्याचबरोबर या शिबिरामध्ये औषधांशिवाय कायरोप्रॅक्टिक पद्धतीने उपचार करण्यात येत आहेत. गरजूंना विना ऑपरेशन जर्मन उपचार पद्धतीद्वारे बनवलेले 'नी ब्रेस' देण्यात येणार आहेत. तब्बल सहा दिवसांच्या या उपचार पद्धतीसाठी नाममात्र दोनशे रुपये शुल्क आकारण्यात आलेले आहे. त्यामुळे गरजू रुग्णानी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन ठाकरेनगर नवरात्रोत्सव समितीचे मार्गदर्शक प्रशांत साळुंके यांनी केले आहे.

# सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आपत्ती निवारण मंत्री गिरीष महाजन पुरबाधित चिंचपूर (ढगे) व वागेगव्हाण शेतशिवाराची केली पाहणी



धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यातील काही भागात २१ सप्टेंबरच्या रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे व त्यामुळे आलेल्या पुरामुळे शेतपिकांचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.अशी परिस्थिती शेतकऱ्यांवर कधीही आली नव्हती.शेतकरी आज अडचणीत सापडला असताना सरकार भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही आपत्ती निवारण व जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनी दिली.

आज जिल्ह्यातील भूम तालुक्यातील चिंचपूर (ढगे) गावाजवळील शेतकरी गणेश मोरे यांच्या शेतात अतिवृष्टी व पुराने नुकसान झालेल्या पिक नुकसानीची पाहणी केल्यानंतर माध्यमांशी श्री.महाजन बोलत होते.यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक रितू खोखर,भूमचे उपविभागीय अधिकारी श्री.डोंगरे,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप सेंगलवार,जलसंपदाचे अधीक्षक अभियंता विजय थोरात, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्री.भंडे,प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री.आसलकर,तहसीलदार जयंत पाटील यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

श्री.महाजन पुढे म्हणाले,मोठ्या प्रमाणात जमिनी खरडून गेल्या आहेत.विहिरी क्षतीग्रस्त झाल्या आहेत,नुकसानीची मदत करण्यासाठी तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.मुख्यमंत्री फडणवीस यांना देखील जिल्ह्यात झालेल्या नुकसानीची जाणीव आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नक्की मदत करण्यात येईल.असे त्यांनी सांगितले.

परंडा तालुक्यातील वागेगव्हाण गावाला श्री.महाजन यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला.तेथून जवळच असलेल्या थोरबोलेवस्ती आणि जगतापवस्ती येथून एनडीआरएफच्या पथकाने सुखरूप सुटका केलेल्या नागरिकांशी देखील त्यांनी संवाद साधला व सध्या या वस्तीत अडकून पडलेल्या नागरिकांशी त्यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधून त्यांना धीर दिला.उदया सकाळी आपल्याला हेलिकॉप्टरच्या मदतीने सुखरूप आणण्यात येईल.असे त्यांना सांगितले.तसेच त्यांनी एनडीआरएफच्या जवानांसोबत सुरू असलेल्या बचावकार्याबाबत चर्चा करून माहिती घेतली.

# धारासूरमर्दिनी देवीची सीओ अंधारे यांच्या हस्ते महाआरती



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- नवरात्र उत्सवात दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि. २३) सायंकाळी ग्रामदैवत धारासुरमर्दिनी देवीची नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

मंदिर समितीच्या वतीने सचिव बाळासाहेब यादव यांच्या हस्ते मुख्याधिकारी अंधारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगर परिषदेचे प्रशासन अधिकारी दीपक तावडे, बाळासाहेब साळुंके, मंदिर समितीचे सदस्य शैलेश कदम, संकेत साळुंके, बालाजी शिंदे, प्रमोद डोके यांच्यासह शहरातील देविभक्त उपस्थित होते.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649